www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज




मुख्य संपादक - भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील   सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 335 गुरुवार दि. 21 ऑगस्ट २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : 6   RNI MAHMAR/2023/89514

# पनवेल महानगरपालिकेचा भोंगळ कारभार उघडकीस – गरीबांच्या जीवाशी खेळ"

**प्रतिनिधी : मुकुंद कांबळे**
**दैनिक युवक आधार**





**पनवेल** – करोडो रुपयांच्या विकासाचा डंका पिटणाऱ्या पनवेल महानगरपालिकेचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. गोरगरिबांच्या जीवाशी खेळ करणारी महापालिका लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे चर्चेत आहे.

**झोपडपट्टीत पाणी, स्थलांतराचा निर्णय**


नवीन पनवेल सेक्टर-1 एस मधील सिद्धार्थ नगर झोपडपट्टीत सततच्या मुसळधार पावसामुळे पाणी शिरले. रहिवाशांचे संसार पाण्यात बुडाल्याने लोकांचे हाल झाले. परिस्थिती हाताळण्यासाठी महापालिकेच्या विनंतीवरून भीम प्रेरणा सांस्कृतिक केंद्र येथे झोपडपट्टीवासीयांना स्थलांतरित करण्यात आले. स्थलांतर हा निर्णय तातडीचा व आवश्यक होता, मात्र पुढे जे घडले ते संतापजनक ठरले.

**जेवणात आळ्या – मुलं, वृद्ध जीवन धोक्यात**

स्थलांतरित नागरिकांना महापालिकेकडून अन्न व नाश्ता पुरविण्यात आला. मात्र सकाळच्या नाष्ट्यामध्ये मोठ्या प्रमाणात आळ्या आढळल्या. हा नाश्ता लहान मुलांनी व वृद्धांनी खाल्ल्याने त्यांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. गरीब नागरिकांना मदतीच्या नावाखाली जीवघेणी परिस्थिती निर्माण करून देणे, हा महापालिकेचा घोर निष्काळजीपणा मानला जात आहे.

**घटनास्थळी धाव**

घटनेची माहिती मिळताच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष व पनवेल महानगरपालिका अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी स्थलांतरित नागरिकांची व्यथा जाणून घेतली आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला. परंतु नेहमीप्रमाणे अधिकारी मंडळींनी "योग्य ती चौकशी करून कारवाई करू" असे थातुरमातुर उत्तर देऊन जबाबदारी झटकली.



***संताप जनक प्रतिक्रिया***

या घटनेवर तीव्र नाराजी व्यक्त करत प्रभाकर कांबळे म्हणाले, "भीक नको पण कुत्रा आवर! गरीब जनतेच्या जीवाशी अशा प्रकारे खेळ करणाऱ्या महापालिकेविरुद्ध आम्ही गप्प बसणार नाही. जर तातकाळ जबाबदारांवर कारवाई झाली नाही, तर सर्व झोपडपट्टीवासीयांना घेऊन महापालिकेविरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा इशारा त्यांनी दिला.

**नागरिकांची संतप्त प्रतिक्रिया**

झोपडपट्टीतील नागरिकांनीही प्रचंड संताप व्यक्त केला. "आम्ही आधीच पावसाने उद्ध्वस्त झालो आहोत. महापालिका आम्हाला सुरक्षित ठिकाणी नेते, पण तिथे जेवणात आळ्या देऊन आमच्या जीवाशी थट्टा करते. गरीब माणूस जिवंत राहावा की मेलेला हेच महापालिकेला महत्त्वाचे नाही का?" असा सवाल त्यांनी केला.

लोकांच्या जिवाशी खेळणार का पालिका?

पनवेल महानगरपालिकेच्या कामकाजावर आधीपासूनच अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित होत आहेत. स्वच्छतेपासून ते अन्नपुरवठ्यापर्यंत सर्वच ठिकाणी निष्काळजीपणा दिसून येत आहे. विकासाच्या नावाने करोडो रुपये खर्च होत असताना गरीब जनतेच्या आरोग्याचा व सुरक्षिततेचा प्रश्न अजूनही ऐरणीवर आहे.

**पनवेल महापालिकेचे उपायुक्त घटनास्थळी भेट.**

पनवेल महापालिकेचे आयुक्त रविकुमार घोडके यांनी घटनास्थळी भेट देऊन जो नाश्ता पुरवला होता हा नाश्ता ची पाहणी केली. नाश्ता मधल्या आळ्या पहिल्या. आणि या गोष्टीला जो कोणी जबाबदार असेल त्याच्यावर कारवाई केली जाईल अशा आश्वासन दिले.

---

# कृषीमंत्र्याच्या आश्वासनाने सलग पाच दिवस चाललेले उपोषण अखेर सुटले

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील शेती महामंडळाचे कामगारांच्या सुविधेसाठी 15 ऑगस्ट पासून सलग पाच दिवस वालचंदनगर पोलीस स्टेशन समोर उपोषण चालू होते. पुणे जिल्हा अध्यक्ष सामाजिक न्याय विभागाचे मा सागर मिसाळ व सहकारी उपोषणास बसले होते. या उपोषणा दरम्यान इंदापूर तालुक्याचे आमदार व राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी भेट देऊन उपोषण कर्त्याची असणारी मागणी शासन दरबारात मांडून योग्य मागण्याची शिफारस करण्यात येईल असे आश्वासन देऊन निवेदन स्वीकारले होते आणि मंगळवारी सायंकाळी मुंबई मंत्रालयात शेती कामगार महामंडळाचे शिष्टमंडळ यांची बैठक आयोजित केली होती परंतु मा दत्तात्रय भरणे यांना अचानक वाशिम येथील पावसामुळे झालेल्या नुकसानी पाहणी दौरा असल्यामुळे उपोषणकर्ते यांच्यासोबत दूरध्वनीवरून चर्चा करून लवकरच पुढील मंगळवारी याविषयी मंत्रालयात बैठक लावली जाईल असे आश्वासन देऊन इंदापूर तालुक्याचे तहसीलदार यांच्यासोबत चर्चा करून उपोषण पाठीमागे घेण्यासाठी सूचना करण्यात आल्या. यावेळी वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे ग्राम महसूल अधिकारी राठोड शेती महामंडळाचे प्रतिनिधी मिराज मुलाणी युनियन प्रतिनिधी राजूभाई पठाण यांच्या हस्ते लिंबू पाणी देऊन शेकडो कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत उपोषण सोडण्यात आले.



# खानगांव खरेदी विक्री केंद्रावर फळे व भाजीपाल्याच्या विक्रमी आवकेची नोंद

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचूर :-दि.२० ऑगस्ट २०२५ :- लासलगांव बाजार समितीच्या खानगांव नजिक तात्पुरत्या खरेदी - विक्री केंद्रावर सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी फळे व भाजीपाला ह्या शेतीमालाची विक्रमी आवक झाली असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर जगताप व उपसभापती संदीप दरेकर यांनी दिली. लासलगांव बाजार समितीने मौजे खानगांव नजिक, खडकमाळेगांव, कोटमगांव, सारोळे खु., वनसगांव, उगांव, शिवडी, खेडे व परीसरातील इतर गावांमधील शेतकरी बांधवांच्या सोईसाठी मौजे खानगांव नजिक येथील ग्रुप ग्रामपंचायतीच्या जागेत गेल्या चार ते पाच वर्षापासुन मिरची, इतर फळे व भाजीपाला ह्या शेतीमालाचे लिलाव सुरू केलेले आहे. दरवर्षी सदर शेतीमाल लिलावास व्यापारी व शेतकरी बांधवांकडुन चांगला प्रतिसाद मिळत असल्याने दिवसेंदिवस सदर खरेदी - विक्री केंद्रावर मिरची, इतर फळे व भाजीपाला शेतीमाल खरेदी-विक्रीची मोठ्या प्रमाणात उलाढाल होत आहे. गेल्या चार ते पाच वर्षाच्या तुलनेत सदर खरेदी - विक्री केंद्रावर सोमवार दि.१८ ऑगस्ट २०२५ रोजी फळे व भाजीपाला ह्या शेतीमालाची विक्रमी आवक होऊन सुमारे ५५० वाहनांमधुन मिरची (हिरवी, पिकेडोर, ढोबळी, ज्वेलरी, बुलेट), काकडी, वाल, घेवडा, भोपळा, वांगी, कारले, दोडके, गिलके, आले, कोबी, फ्लॉवर, मेथी, कोथंबीर अशा विविध प्रकारच्या फळे व भाजीपाल्याच्या २८,२४१ बॅग विक्रीस आल्या होत्या. विक्रीसाठी आलेल्या सर्व शेतीमालाचे वेळेत लिलाव, वजनमाप व चुकवती इ.प्रक्रिया पार पाडणेसाठी बाजार समितीचे सर्व अडते, व्यापारी, शेतकरी, कामगार वर्गाचे मोठे योगदान असल्याचे सभापती ज्ञानेश्वर जगताप यांनी सांगितले. यावेळी बाजार समितीचे उपसभापती संदीप दरेकर व सचिव नरेंद्र वाढवणे यांनी सदर खरेदी-विक्री केंद्रास समक्ष भेट देऊन शेतीमाल विक्रीसाठी आलेल्या आवकेचा आढावा घेऊन अडते, व्यापारी व कामगार वर्गास जलदगतीने लिलावाचे व वजनमापाचे कामकाज करून शेतकरी बांधवांना रोख चुकवती अदा करणेसाठी सुचना दिल्या. सदर प्रसंगी बाजार समितीचे लिलाव पुकारणार कामगार तुषार शेजवळ यांनी आलेल्या सर्व शेतीमालाचा लिलाव सलग पुकारला, त्याबद्दल त्यांचा बाजार समिती, शेतकरी व व्यापारी वर्गाच्या वतीने सत्कार करण्यात आला.



> हि अभुतपुर्व आवक हा शेतकरी बांधवांचा विश्वास, अडते व व्यापाऱ्यांचा उत्साह, कामगार व गाडीचालकांचे कष्ट तसेच बाजार समितीच्या सेवक वृंदाचे अथक प्रयत्न यांचे फलित आहे. या यशामध्ये ज्यांनी ज्यांनी योगदान दिले त्या सर्वांचे लासलगांव बाजार समितीतर्फे हार्दिक अभिनंदन व आभार.
> ज्ञानेश्वर जगताप
> **सभापती, लासलगाव कृ.ऊ.बा.समिती**

# पुणे समर्थ पोलिसांची धमाकेदार कामगिरी

## समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर

**दैनिक युवक आधार**
**पुणे जिल्हा प्रतिनिधी**

गहाळ झालेले व सायबर गुन्हयातील चोरी गेलेले ८,००,०००/-रु. कि.चे १२ मोबाईल फोन केले हस्तगत

केंद्र शासनाच्या सी.ई. आय. आर (CEIR) प्रणालीचा वापर करुन समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहरकडील पोलीस निरीक्षक, गुन्हे श्री. चेतन मोरे व पोलीस अंमलदार सुवर्णा जाधव, अविनाश दरवडे, सुनिता खोमणे यांनी समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहरच्या हद्दीत हरवलेल्या तसेच सायबर गुन्हयातील चोरीस गेलेल्या मोबाईल संबंधीत डेटा तयार करुन त्याबाबत तांत्रिक तपास करुन त्यांचा वारंवार पाठपुरावा केला. त्यानुसार हरविलेले तसेच गुन्हयातील चोरीस गेलेले मोबाईल फोन हे महाराष्ट्रातील विविध जिल्हयात व तसेच इतर राज्यात वापरत असल्याचे निर्देशनास आले. सदरचे मोबाईल फोन वापरकर्त्यांशी तसेच संबंधित पोलीस ठाण्यास पत्रव्यवहार करुन व संवाद साधुन हरविलेले तसेच गुन्हयातील चोरीस गेलेले एकुण ८,००,०००/- रु. किंमतीचे १२ मोबाईल फोन (०६ ॲपल कंपनीचे आय फोन व ०६ इतर कंपनीचे मोबाईल फोन) हस्तगत करण्यात यश मिळाले आहे.

सदरचे हस्तगत करण्यात आलेले मोबाईल फोन संबंधितांना मा. पोलीस उप-आयुक्त, परी.०१, पुणे शहर श्री. कृषिकेश रावले यांचे हस्ते परत करण्यात आले.

सदरची कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. राजेश बनसोडे, मा. पोलीस उप-आयुक्त परी ०१ श्री. कृषिकेश रावले यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, फरासखाना विभाग, पुणे शहर श्रीमती अनुजा देशमाने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर श्री. उमेश गित्ते, पोलीस निरीक्षक गुन्हे, समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर श्री. चेतन भोरे यांचे सुचनेप्रमाणे समर्थ पोलीस स्टेशनकडील सायबर पोलीस पथकाचे पोलीस अंमलदार सुवर्णा जाधव, अविनाश दरवडे, सुनिता खोमणे व अर्जुन कुडाळकर यांनी केली आहे.




---

# बिवलकर कुटुंबाच्या लाभात भूखंड हा गैरव्यवहार. आ.रोहित पवार

### स्थानिक भूमिपुत्रांच्या घरांसाठीचा हक्काचा असेल हा भूखंड ..मा. आ.बाळाराम पाटील

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई वार्ताहर**

सिडकोने १२.५ टक्के योजनेअंतर्गत बिवलकर कुटुंबाला सुमारे ५ हजार कोटी रुपये किंमतीचा १५ एकरचा भूखंड बेकायदेशीरपणे दिल्याबद्दल 'राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षा'चे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे आणि आ.रोहित पवार यांनी स्थानिक भूमिपुत्रांसह नवी मुंबईतील सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिलं. स्थानिक भूमिपुत्रांच्या घरांसाठीचा हक्काचा भूखंड बिवलकर कुटुंबाच्या घशात घालणं हा मोठा गैरव्यवहार आहे.

देशातील वनविभागाच्या बळकावलेल्या सर्व जमिनी परत घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. त्यानुसार बिवलकर कुटुंबाला बेकायदा पद्धतीने जमीन देण्याचा घेतलेला निर्णय रद्द करावा आणि १२.५ टक्के योजनेअंतर्गत खऱ्या प्रकल्पग्रस्तांनी केलेले दावे त्वरित मंजूर करण्याची मागणी करत आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांचीही मागणी करण्यात आली.




यावेळी आ. शशिकांत शिंदे आणि आ.रोहित पवार, प्रवक्ते महेशदादा तपासे, रविकांत वरपे, प्रदेश उपाध्यक्षा भावनाताई घाणेकर, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष सी. आर. पाटील, मा. बाळाराम पाटील , प्रदेश सरचिटणीस (युवक) सौरभ काळे, शिवसेना (उबाठा) नेते शिरीष घरत , मा. आ. सुधाकर भालेराव , राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, कोकण विभागीय अध्यक्ष प्रमोद बागल, नवी मुंबई युवक जिल्हाध्यक्ष अन्नू आंग्रे, उरण विधानसभा अध्यक्ष गणेश (नाना) नलावडे, पनवेल युवक अध्यक्ष शहबाज पटेल आणि प्रदेश सरचिटणीस रेहमान सय्यद उपस्थित होते.

# पुणे पर्वती पोलिसांनी आवळल्या आरोपीच्या मुस्क्या

## पर्वती पोलीस स्टेशन, पुणे शहर

**दैनिक युवक आधार**
**पुणे जिल्हा प्रतिनिधी संतोष लांडे**

रात्रीचे वेळी घरफोडी करुन जाग्वार कंपनीचे प्लबींनगचे साहित्य चोरी करणा-या आरोपीस केले जेरबंद दि.१०/०८/२०२५ रोजी रात्रीचे वेळी पर्वती पोलीस स्टेशन हद्दितील भाग्यलक्ष्मी हॉर्डवेअर, प्लॉट नं. ५, मित्र मंडळ कॉलनी पर्वती दर्शन पुणे ०९ येथील दुकानामध्ये प्रवेश करुन अज्ञात इरामाने महागडे जाग्वार कंपनीचे प्लबींग साहित्य, इन्व्हटर बॅटरी व रोख रक्कम असा एकुण १,०७,६००/-रु.किं. चा मुद्देमाल घरफोडी करुन चोरी गेला होता. सदर बाबत फिर्यादी यांनी दिले तक्रारीवरुन पर्वती पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २५१/२०२५ भा.न्या.सं.क. ३०५, ३३१ (३), ३३१ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

दाखल गुन्हयाचा तपास मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नंदकुमार गायकवाड व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती अनिता हिवरकर यांचे मार्गदर्शनाखाली पर्वती पोलीस स्टेशन चे तपास पथक प्रभारी पोलीस उप-निरीक्षक, श्री. किरण पवार हे करत असताना पोलीस अंमलदार महेश मंडलिक यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीन्वये सदरचा गुन्हा हा अक्षय शंकर कांबळे वय २५ वर्षे, रा. मिरेकर वस्ती, वैदुवाडी हडपसर पुणे याने केला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास शिताफिने हडपसर भागातून पकडुन त्याचे ताब्यातुन एकुण ९२,८००/- रु.किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.




सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री. राजेश बनसोडे, मा. पोलीस उप-आयुक्त परि-०३, पुणे शहर श्री. संभाजी कदम, मा. सहा. पोलीस आयुक्त सिंहगड रोड विभाग पुणे शहर श्री. अजय परमार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पर्वती पोलीस स्टेशन श्री. नंदकुमार गायकवाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती अनिता हिवरकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक किरण पवार, पोलीस अंमलदार प्रकाश मरगजे, महेश मंडलिक, सुर्या जाधव, श्रीकांत शिंदे, सद्दाम शेख, अमोल दबडे, अमित चिन्हे, नानासो खाडे, राकेश सुर्वे व मनोज बनसोड यांनी केली.

# अभिमानास्पद जोगेश्वरीच्या शिरपेचात मानाचा तुरा – १० थरांचा मनोरा रचून नवा विश्वविक्रम

**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर**
**, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

जोगेश्वरी दहीहंडीची पंढरी म्हणून लौकिक असलेल्या जोगेश्वरीत पुन्हा एकदा सुवर्णअक्षरांनी लिहावा असा इतिहास घडला आहे. कोकण नगर गोविंदा पथक आणि जय जवान गोविंदा पथक यांनी जोगेश्वरी मातेच्या आशीर्वादाने आणि असंख्य प्रेक्षकांच्या जयघोषाच्या साक्षीने तब्बल १० थरांचा मानवी मनोरा उभारण्यात अभूतपूर्व यश संपादन केले.

या विश्वविक्रमामुळे जोगेश्वरीच्या शिरपेचात मानाचा नवा तुरा रोवला गेला असून, संपूर्ण महाराष्ट्रभर आणि विशेषतः गोविंदा प्रेमी समाजात आनंदाचा प्रचंड जल्लोष साजरा होत आहे.

जयघोषांनी दुमदुमलेले वातावरण





विक्रमाचे साक्षीदार होण्यासाठी परिसरात हजारोंच्या संख्येने नागरिक, महिला, लहानगे आणि ज्येष्ठ मंडळी उपस्थित होती. *"गोविंदा आला रे आला!"*च्या घोषणांनी दणाणून गेले होते. प्रत्येक थर उभा राहताच उसळलेल्या टाळ्यांचा कडकडाट आणि जयजयकाराने वातावरण दुमदुमून गेले.

शिस्त, समन्वय आणि परंपरेचा संगम

या विक्रमी मनोऱ्यातील प्रत्येक थरामागे दिसून आली ती पथकांची वर्षानुवर्षांची मेहनत, कसून सराव आणि अद्वितीय समन्वय. गोविंदांचा आत्मविश्वास, शिस्त आणि चिकाटी याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दहीहंडी म्हटलं की जोगेश्वरीचे नेहमीच एक वेगळे स्थान राहिले आहे. याआधी अनेक थरांचे मानवी मनोरे घडवून जोगेश्वरीकरांनी परंपरेला नवा आयाम दिला आहे. पण आता १० थरांचा विक्रमी मनोरा घडवून आणल्याने जोगेश्वरीला खऱ्या अर्थाने दहीहंडीची राजधानी मानले जाऊ लागले आहे.

सामाजिक एकतेचा आदर्श

हा विक्रम केवळ शारीरिक क्षमतेचा नाही, तर एकतेचा, सहकार्याचा आणि परंपरेच्या जपणुकीचा आदर्श आहे. समाजातील सर्व घटकांच्या सहभागाने दहीहंडी हा उत्सव कसा सामाजिक ऐक्य, धैर्य आणि बंधुभाव अधोरेखित करतो याचे हे सर्वोत्तम उदाहरण आहे.

अलीकडच्या यशाची परंपरा

अवघ्या काही दिवसांपूर्वी झालेल्या 'प्रो गोविंदा' स्पर्धेत जोगेश्वरीतील आर्यन्स गोविंदा (नागपूर निन्जास) पथकाने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला होता. त्या यशानंतर लगेचच १० थरांचा जागतिक विक्रम घडवून जोगेश्वरीच्या गोविंदांनी आपला लौकिक पुन्हा एकदा सिद्ध केला आहे.

## खानगांव खरेदी विक्री केंद्रावर फळे व भाजीपाल्याच्या विक्रमी आवकेची नोंद

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचूर :-दि.२० ऑगस्ट २०२५ :- लासलगांव बाजार समितीच्या खानगांव नजिक तात्पुरत्या खरेदी - विक्री केंद्रावर सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी फळे व भाजीपाला ह्या शेतीमालाची विक्रमी आवक झाली असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर जगताप व उपसभापती संदीप दरेकर यांनी दिली. लासलगांव बाजार समितीने मौजे खानगांव नजिक, खडकमाळेगांव, कोटमगांव, सारोळे खु., वनसगांव, उगांव, शिवडी, खेडे व परीसरातील इतर गावांमधील शेतकरी बांधवांच्या सोईसाठी मौजे खानगांव नजिक येथील ग्रुप ग्रामपंचायतीच्या जागेत गेल्या चार ते पाच वर्षापासुन मिरची, इतर फळे व भाजीपाला ह्या शेतीमालाचे लिलाव सुरू केलेले आहे. दरवर्षी सदर शेतीमाल लिलावास व्यापारी व शेतकरी बांधवांकडुन चांगला प्रतिसाद मिळत असल्याने दिवसेंदिवस सदर खरेदी - विक्री केंद्रावर मिरची, इतर फळे व भाजीपाला शेतीमाल खरेदी-विक्रीची मोठ्या प्रमाणात उलाढाल होत आहे.

गेल्या चार ते पाच वर्षाच्या तुलनेत सदर खरेदी - विक्री केंद्रावर सोमवार दि.१८ ऑगस्ट २०२५ रोजी फळे व भाजीपाला ह्या शेतीमालाची विक्रमी आवक होऊन सुमारे ५५० वाहनांमधुन मिरची (हिरवी, पिकेडोर, ढोबळी, ज्वेलरी, बुलेट), काकडी, वाल, घेवडा, भोपळा, वांगी, कारले, दोडके, गिलके, आले, कोबी, फ्लॉवर, मेथी, कोथंबीर अशा विविध प्रकारच्या फळे व भाजीपाल्याच्या २८,२४१ बॅग विक्रीस आल्या होत्या. विक्रीसाठी आलेल्या सर्व शेतीमालाचे वेळेत लिलाव, वजनमाप व चुकवती इ.प्रक्रिया पार पाडणेसाठी बाजार समितीचे सर्व अडते, व्यापारी, शेतकरी, कामगार वर्गाचे मोठे योगदान असल्याचे सभापती ज्ञानेश्वर जगताप यांनी सांगितले.

यावेळी बाजार समितीचे उपसभापती संदीप दरेकर व सचिव नरेंद्र वाढवणे यांनी सदर खरेदी-विक्री केंद्रास समक्ष भेट देऊन शेतीमाल विक्रीसाठी आलेल्या आवकेचा आढावा घेऊन अडते, व्यापारी व कामगार वर्गास जलदगतीने लिलावाचे व वजनमापाचे कामकाज करून शेतकरी बांधवांना रोख चुकवती अदा करणेसाठी सुचना दिल्या. सदर प्रसंगी बाजार समितीचे लिलाव पुकारणार कामगार तुषार शेजवळ यांनी आलेल्या सर्व शेतीमालाचा लिलाव सलग पुकारला, त्याबद्दल त्यांचा बाजार समिती, शेतकरी व व्यापारी वर्गाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

बॉक्स:

हि अभुतपुर्व आवक हा शेतकरी बांधवांचा विश्वास, अडते व व्यापाऱ्यांचा उत्साह, कामगार व गाडीचालकांचे कष्ट तसेच बाजार समितीच्या सेवक वृंदाचे अथक प्रयत्न यांचे फलित आहे. या यशामध्ये ज्यांनी ज्यांनी योगदान दिले त्या सर्वांचे लासलगांव बाजार समितीतर्फे हार्दिक अभिनंदन व आभार.

ज्ञानेश्वर जगताप
सभापती, लासलगाव कृ.ऊ.बा.समिती

## संत सेना महाराज पुण्यतिथी निमित्त माणुसकी वृध्द आश्रमात महाप्रसादाचे वाटप.

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा प्रतिनिधीः- रमेश सुरशे (छत्रपती संभाजीनगर)**

राष्टसंत सेना महाराजांच्या पुण्यतिथी निमित्ताने सु-लक्ष्मी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षी सुद्धा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे हे ९ वे वर्षे आहे,समाजसेवक सुमित पंडित यांनी संत सेना महाराज यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून पुजन केले,सौ.पुजा सुमित पंडित यांच्या हस्ते संत सेना महाराजांची महाआरती करुन या कार्यक्रमाची सुरवात केली.सुमित यांनी संत सेना महाराजांच्या जीवनकाळावर प्रकाश टाकत "चित्त नाहीं हातीं करूं जाता हरिभक्ति॥ मज तुली वासना।भेटी द्यावी नारायणा॥कोण जाणे दानधर्म।नव्हे स्वतंत्र कैचें कर्म॥सेना म्हणे सांगें मात।जेणें माझें होय हित॥सेना म्हणे करा रे बदल। वरिवर्तनाचे गुण आचरावे।। उपस्थितांना मार्गदर्शन केले. संत सेना महाराज पुण्यतिथी निमित्त माणुसकी वृध्द आश्रमात महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी चार्ली फाउंडेशन चे सोमनाथ स्वभावणे,समाजसेवक सुमित पंडित,मुबारक शहा सर,विजय निंबाळकर,
कल्पेश पंडित,देविदास पंडित,समाजसेविका पुजा पंडित,प्रियंका मॅडम,लक्ष्मी पंडित,आदिंनी परिश्रम घेतले.

## अल्पवयीन मुलीला रस्त्यात अडवून केली मारहाण

### आरोपींविरोधात वडकी ठाण्यात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः- जितेंद्र खोडे**



वडकी :-पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बोरी ईचोड येथील एका २५ वर्षीय युवकाने एका अल्पवयीन मुलीला रस्त्यात अडवून माझ्याशी लग्न का करत नाही म्हणत वाद घालून मारहाण केली व फोटो सोशल मिडिया वर व्हायरल केले. या प्रकरणी १८ ऑगस्ट रोजी आरोपी विरोधात वडकी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणी वडकी पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार वडकी ठाण्याच्या हद्दीतील बोरी ईचोड येथील राकेश अजय लिचडे (२५) या युवकाने पिडीत अल्पवयीन मुलगी नातेवाईकांसोबत दुचाकीने खैरीकडून मार्डी कडे जात होती.दरम्यान खैरी पासून काही अंतरावर असलेल्या दापोरा नाल्याजवळ सदर आरोपीने दुचाकी अडवून तू माझ्याशी लग्न का करत नाही असा सवाल करत तिला मारहाण केली.हि घटना १७ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता चे सुमारास घडली असून या प्रकरणी १८ ऑगस्ट रोजी पिडीतेने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपींविरोधात विनयभंग,पोक्सोसह,अट्रोसीटी अक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. सदर आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून सुचनापत्रावर सोडण्यात आल्याची माहिती मिळाली असून पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी पांढरकवडा रॉबिन बंसल करीत आहेत.

## ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागात हि पावसाचा फटका गावकरी ग्रामस्थ यांनी वाचवले मुक्या प्राण्यांचे जिव

**दै युवक आधार**
**. दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**

मोहोने गणेश घाट

उल्हास नदीची पाणी पातळी वाढत आहे गरज असेल तरच घरा बाहेर पडा असे रायते गावांचे ग्रामस्थ आणि युवा तरुन आणि काही समाजकार्यते यांनी फलक हि लावले आहे पुढे जाऊ नका आपलीं रात्र दिवस हि रोडवरती बसून समाज सेवा केली आहे कारण 48 तास उल टूनही गेले अजुनही पाऊस चालूच आहे कुठे या पाण्याने वाईट घटना घडु नाही म्हणून आपले जिउ मुठीत धरून आगदी रोडच्या कडेला ठिय्या मांडून बसले आहे जाणाऱ्या येणाऱ्यांना ते नाकार देता पुढें जाऊ नका पाण्याची पातळी वाढत आहे दहागाव रायते वरप माहरळ कांबा पांचवा मैल असे बरेच नदि काठी गावं आहेत त्यांना पुराच्या पाण्यामुळे नुकसान झाले आहे त्यांना ताबडतोब ओला दुष्काळ जाहीर करावा आणि तात्काळ पंचनामे करून त्यानं भरपाई देण्यात यावे अशी मागणी गावकरी करतं आहे रायते गावचे प्रत्येक वर्षी फार नुकसान होते जी जमीन होती ती अर्ध्य रोड मध्ये गेलीं आणि जी उरली ती पुराच्या पाण्याने धुऊन गेलीं बाकी उरले दगड काय पीकवणार आणि काय खाणार होतें थोडसा भाजी पाला ते पण वाहुन गेले आता कसें लेकरा बाळाचे पोट आम्ही जगवायचे हा




प्रशन शेतकरी यांना पडला आहे सरकार मायबाप यांनी आम्हाला मदतीचा हात लवकर दिला पाहिजे गोवेली पोलिस चौकीचे कर्मचारी हे पण डोळ्यात तेल घालून आपलीं डिवंटि आगदी बजावत आहे रात्री बे रात्री पेट्रोलिंग करत आहे गावकरी ग्रामस्थ त्यांना सहकार्य करीत आहे

## सोमवारी आमदार प्रशांत ठाकूर चषक 2025 वक्तृत्व स्पर्धेची महाअंतिम फेरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, वक्तृत्वकौशल्य व नेतृत्वगुण विकसित व्हावेत या उद्देशाने पनवेल महानगरपालिका आणि कोशिश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेची महाअंतिम फेरी सोमवार दिनांक २५ ऑगस्ट रोजी सकाळी ९. ३० वाजता खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी निर्भीडपणे व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ मिळवून देणे ही काळाची गरज होती. त्या नुसार विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणाला प्रोत्साहन देण्यासाठी कोशिश फाउंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५" वक्तृत्व स्पर्धेत वर्ग आणि शाळा अंतर्गत फेरीत उत्तम तयारीसह विचार मांडले. त्यामुळे हि स्पर्धा विद्यार्थ्यांना नेतृत्व करण्याची उत्तम संधी मिळाली. वर्ग आणि शाळा




अंतर्गत फेरीत विद्यार्थ्यांनी सादर केलेले विषय अतिशय वैविध्यपूर्ण आणि महत्वपूर्ण होते. प्रत्येक भाषणात त्यांच्या कल्पकतेचा आणि विचारशक्तीचा सुंदर आविष्कार दिसून आला. त्या अनुषंगाने हि वक्तृत्व स्पर्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल कामोठे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे, चांगु काना ठाकूर विद्यालय नवीन पनवेल (इंग्रजी माध्यम), चांगु काना ठाकूर विद्यालय नवीन पनवेल (मराठी माध्यम), सुषमा पाटील विद्यालय कामोठे, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय कामोठे, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुर्बी, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खारघर, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोपरा, केएसए बार्न्स स्कूल, पनवेल महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. ०१ ते ११ शाळा आदी शाळांचा सहभाग मिळाला. स्पर्धेच्या पहिल्या फेरीत एकूण १६,८८७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि ४०५ वर्गांमधून निवड झालेल्या २०२५ विद्यार्थी शाळा अंतर्गत फेरीसाठी अर्थात दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले. यामधून पात्र ठरलेले विद्यार्थी सोमवारी होणाऱ्या महाअंतिम फेरीत आपले वक्तृत्व कौशल्य सादर करणार आहेत.

# घाटंजीमध्ये राज्यस्तरीय छायाचित्र प्रदर्शनी स्पर्धा उत्साहात संपन्न

### राज्यभरातून आलेली छायाचित्रकांचा सजला आकर्षक छायाचित्रांचा मेळावा

**दैनिक युवक आधार**
**- घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

घाटंजी – कला आणि संस्कृतीचा संगम असलेल्या घाटंजी शहरात १८ आणि १९ ऑगस्ट रोजी प्रथमच राज्यस्तरीय छायाचित्र प्रदर्शनी स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. न.प. सांस्कृतिक भवन येथे आयोजित या स्पर्धेला राज्यभरातील छायाचित्रकारांनी भरभरून प्रतिसाद दिला. दोन दिवसांच्या या प्रदर्शनाला कलाप्रेमी, विद्यार्थी आणि नागरिक यांचा मोठा प्रतिसाद लाभला.

घाटंजी फोटोग्राफर बहुउद्देशीय संस्थेने आयोजित केलेल्या या स्पर्धेत निसर्गदृश्य, पर्यावरण संवर्धन, ऐतिहासिक वारसा, ग्रामीण संस्कृती, वन्यजीवन, सामाजिक बदल आणि स्त्रीशक्ती अशा विविध विषयांवरची शेकडो छायाचित्रे सादर करण्यात आली. प्रत्येक छायाचित्रातून एक वेगळी कहाणी प्रेक्षकांना अनुभवता आली. काही निसर्गचित्रांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं, तर काही सामाजिक छायाचित्रांनी वास्तवाचं भान जागवलं.

स्पर्धेचे उद्घाटन आणि मान्यवरांची उपस्थिती

१८ ऑगस्ट रोजी तहसीलदार विजय साळवे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महेश पवार होते, तर मॅक्रो छायाचित्रकार आसेगावकर यांनी संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रम आणि विदर्भस्तरीय छायाचित्र स्पर्धांच्या पुस्तिकांचे प्रकाशन




केले. कार्यक्रमाला निरज आहुजा, मनोज कटकतलवारे, पारवा ठाणेदार संदीप नरसाळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेने नवोदित छायाचित्रकारांना आपली कला सादर करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ दिलं.

विजेत्यांचा सन्मान आणि गौरव

१९ ऑगस्ट रोजी स्पर्धेचा समारोप आणि बक्षीस वितरण सोहळा पार पडला. यावेळी पोलीस निरीक्षक केशव ठाकरे, बंडूभाऊ तोडसाम, कैलास कोरवते, गणेश अस्वले, विनू कोठारी, कानकाटे सर, प्रशांत नित आणि इतर मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचा रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

व्यावसायिक गट (सण, उत्सव)
प्रथम क्रमांकः प्रशांत खरोटे (नाशिक)
द्वितीय क्रमांकः हिरा पंजाबी (ठाणे)
तृतीय क्रमांकः अंकुर तांबे (मुंबई)

हौशी गट (खुल्या विषय)
प्रथम क्रमांकः प्रदीप शिंदे (नाशिक)
द्वितीय क्रमांकः सुजित म्हात्रे (मुंबई)
तृतीय क्रमांकः आदित्य भट (रत्नागिरी)

याव्यतिरिक्त, प्रत्येक गटात तीन वैयक्तिक प्रोत्साहनपर बक्षिसेही देण्यात आली. यातील विशेष कौतुकाची बाब म्हणजे १० वर्षांचा चिमुकला नक्ष गावंडे याने वाइल्ड लाईफ गटात विशेष स्थान पटकावले. यापूर्वीही नक्षने कलकत्ता, पुणे आणि मुंबई येथे पुरस्कार मिळवले आहेत. त्याच्या या कामगिरीबद्दल उपस्थितांनी त्याचे भरभरून कौतुक केले.

ज्येष्ठ छायाचित्रकाराचा जीवनगौरव

या स्पर्धेचं आणखी एक मोठं आकर्षण म्हणजे ८६ वर्षीय ज्येष्ठ छायाचित्रकार किशोरीलालजी आहुजा यांचा 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन करण्यात आलेला सन्मान. गेल्या चार पिढ्यांपासून फोटोग्राफी व्यवसायात असलेल्या आणि पाकिस्तानातील जंग जिल्ह्यातून यवतमाळमध्ये 'आहुजा स्टुडिओ'च्या नावाने उत्तम कार्य करणाऱ्या किशोरीलालजींच्या योगदानाला यावेळी सलाम करण्यात आला.

प्रदर्शनी पाहण्यासाठी घाटंजी शहरासह परिसरातील शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेकांनी या छायाचित्रांचं कौतुक केलं. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी घाटंजी फोटोग्राफर्स असोसिएशन आणि बहुउद्देशीय संस्थेच्या सर्व सदस्यांनी अथक प्रयत्न केले. या राज्यस्तरीय स्पर्धेमुळे घाटंजीला कला-संस्कृतीच्या नकाशावर एक नवं स्थान मिळालं आहे. भविष्यातही अशा स्पर्धांचं आयोजन करण्याची मागणी जोर धरत आहे.

## पत्रकार प्रफुल वासुदेव नान्ने यांची भोई समाज युवा मंच महाराष्ट्र प्रदेश यवतमाळ जिल्हा अध्यक्ष पदी निवड

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-जितेंद्र खोडे**



पांढरकवडा :-दिनांक १७/०८/२०२५ रोजी भोई समाज युवा मंच महाराष्ट्र प्रदेश,यवतमाळ जिल्हा अध्यक्ष पदी मा.श्री.प्रफुल वासुदेव नान्ने यांची निवड करण्यात आली,प्रफुल नांन्ने हे एक पत्रकार सोबतच एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून सर्वपरिचित व्यक्तिमत्व आहे,प्रफुल नान्ने यांनी वेळोवेळी अनेक सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन जन सामान्यांच्या हितासाठी सदैव तत्पर असतात. तसेच अनेक वेळा गरजू लोकांना रक्तदान कार्यक्रमाचे आयोजन करून लोकोपयोगी कार्य पार पाडले.अत्यंत साधे राहणीमान असणारे प्रफुल नान्ने यांनी आपल्या समाजकार्याचे श्रेय कधीच घेतले नाही.आपण समाजात वावरताना समाजाला आपण काही देणे लागतो,लोकांसाठी चांगले कार्य केले तर ते,आणखी लोक अनुसरण करून समाजात एक चांगला संदेश नवीन पिढीत रुजवला जाऊन, सामाजिक बांधिलकी जोपासली जाईल या भावनेने प्रेरित होऊन आपले सामाजिक कार्यात कधीच खंड पडू देत नाही.या सर्व सामाजिक कार्य लक्षात घेता,भोई समाज युवा मंच प्रमुख,कोअर कमिटी,तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री.तुषार भाऊ साटोटे यांच्या सूचने नुसार तसेच विदर्भ अध्यक्ष श्री.प्रविण कोल्हे यांच्या मार्फत निवड करण्यात आली समाजकार्याची दखल घेऊन यवतमाळ जिल्हा अध्यक्ष पदी मा. श्री. प्रफुल वासुदेव नान्ने यांची निवड करण्यात आली आहे,त्याना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा भोई समाज युवा मंच महाराष्ट्र प्रदेश कडून तसेच संजय इंगळे भोई समाज युवा मंच महाराष्ट्र यांच्या तर्फे व मित्र परिवार बंडूजी नान्ने,अरविंद झाडे,रमेश शिवरकार,गणेश कोरडवार,अश्विन ठाकरे,गणेश नांन्ने,अभि बेले,दिलीप टेकाम,प्रफुल शिवरकार,निलेश शिवरकार,प्रसाद ढोपटे,चेतन सामजवार,मनोज नान्ने,कुणाल कणाके,प्रदीप नान्ने,शंकर शिवरकार,पुंडलिक नान्ने,मनःपूर्व अभिनंदन व शुभेच्छा देण्यात आल्या.

दैनिक युवक आधार

हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR

Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## पत्रकार व सामाजिक कार्यकर्ता सारंग महाजन समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर**
**, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी समाजक्रांती राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा अमरावती येथे संपन्न झाला. बी एस एफ बहुउद्देशीय संस्था अमरावती उपेक्षित नायक न्यूज व संत कबीर बहुउद्देशीय संस्था बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमान आयोजित समाज क्रांती पुरस्कार सोहळ्यात पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते नावलौकिक असलेल्या सारंग महाजन यांना समाजक्रांती राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील अनेक फिल्म स्टार, रील स्टार , निर्माते, दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री पत्रकार वर्ग व सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थितीमध्ये व संस्थापक अध्यक्ष भूषण सरदार यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पत्रकार सारंग महाजन यांच्या ह्या पुरस्काराबद्दल त्यांना विविध क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे








# पुनर्भेट वर्गमित्रांची – तब्बल 28 वर्षांनंतर आनंदाचा स्नेहमेळावा

**दैनिक युवक आधार**
**भिसे-वाघोली (ता. लातूर) –**

भगतसिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, भिसे-वाघोली येथील १९९७-९८ च्या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा व गुरु-सन्मान सोहळा रविवारी (दि. १७ ऑगस्ट २०२५) मोठ्या उत्साहात पार पडला. तब्बल २८ वर्षांनी वर्गमित्र भेटल्याने वातावरण आनंदमय झाले

१९९८ मध्ये दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षण व व्यवसायामुळे मित्रमंडळी वेगवेगळ्या ठिकाणी विखुरली होती. मात्र, शालेय जीवनातील गोड आठवणींना उजाळा देण्यासाठी सोशल मीडियावर तयार झालेल्या 'स्कूल कट्टा' ग्रुपच्या माध्यमातून हा मेळावा आयोजित करण्यात आला. पावसामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भिसे-वाघोली



येथे कार्यक्रम पार पडला. प्रारंभी दिवंगत शिक्षक व विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करून, प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली

सभागृहातील कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी ॲड. इरफान शेख होते. तर प्रमुख पाहुण्यांमध्ये जीवन पाठवतकर सर, देशमुख सर, मोहन गणेग सर, बनसोडे सर, बेस्के सर, धोत्रे सर, पुरी सर, कदम सर, जाधवर मॅडम व सूर्यवंशी सर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व गुरुजनांचा सत्कार करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल भिसे यांनी केले. पहिल्या सत्रात माजी विद्यार्थ्यांनी आपली ओळख करून दिली, कौटुंबिक माहिती शेअर केली तसेच शालेय जीवनातील खोड्या, शिक्षा, खेळ, परीक्षेचे अनुभव या आठवणींना उजाळा दिला

या वेळी डॉ. वैभव पाटील (पुणे), अनिल भिसे, गोविंद भिसे, रामचंद्र भिसे, कुंडलिक भिसे, शाहाजी चौगुले, काकासाहेब सोनवणे, महादेव मांदळे, जमील सय्यद, सादिक अली सय्यद, नवाब सय्यद, भाऊसाहेब आल्टे, भाग्यश्री भिसे, सुरेखा धुमाळ, आसमा बी. सय्यद आदींसह अनेक वर्गमित्र-मैत्रिणी उपस्थित होते. सर्वांनी आपापले मनोगत व्यक्त केले. काहींना गहिवरून आले तर काहींनी मैत्रीच्या आठवणींनी साऱ्यांना मंत्रमुग्ध केले

शिक्षकांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करत विविध क्षेत्रात निर्माण केलेल्या प्रभुत्वाबद्दल अभिमान व्यक्त केला

"आता तुमच्या पाल्याकडे लक्ष द्या, पुढची पिढी चांगली घडवा" असा मौलाचा सल्ला गुरुजनांनी दिला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी पुन्हा एकदा वर्ग भरवून जाधवर मॅडमचा वर्ग अनुभवला आणि पुन्हा शाळेत आल्यासारखा आनंद घेतला

२८ वर्षांनी झालेल्या या पुनर्भेटीत मैत्रीची ओढ स्पष्ट दिसून आली. सुख-दुःख वाटून घेताना सर्वांच्या डोळ्यांत पाणी तर होतेच, पण "किमान तीन वर्षांनी एकदा तरी भेटूया" असा निर्धारही करण्यात आला

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी काकासाहेब सोनवणे, गोविंदराव भिसे, अनिल भिसे, महादेव मांदळे, नवनाथ शिंदे व गुणवंत भिसे यांनी घेतलेल्या परिश्रमाचे सर्वांनी कौतुक केले. बब्रुवान बोराडे, कुंडलिक भिसे व तानाजी पवार यांच्या वतीने आयोजक मित्रांना भेटवस्तू देण्यात आल्या. असा हा अविस्मरणीय सोहळा मैत्रीच्या गोड आठवणींनी मनावर कायमचा कोरला गेला.

## पालोद येथे दिव्यांग बांधवांना 5 % निधीचे वाटप

### भाजपा अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष अमजद पठाण यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** : तालुक्यातील पालोद ग्रामपंचायत हद्दीतील सर्व नोंदीत दिव्यांग बांधवांना शासनाच्या आदेशानुसार 5% टक्के निधीचे वाटप ग्रामसेवक जयदीप सुरुशे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. प्रत्येक ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्या स्वनिधीतून दिव्यांगांसाठी 5% निधी खर्च करून त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न करावे असे शासकीय धोरण आहे. या धोरणानुसार पालोद ग्रामपंचायतने एकूण नोंदणीकृत 52 दिव्यांग बांधवांना प्रत्येकी 2000 रुपयांच्या चेकचे वितरण करण्यात आले. ग्रामपंचायत ने दिलेल्या या निधीमुळे दिव्यांग बांधवांना आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी मोलाची मदत झाली आहे.



box

***अमजद पठाण यांच्या पाठपुराव्याला यश**

भारतीय जनता पार्टीचे अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष अमजद पठाण यांनी पालोद ग्रामपंचायतीकडे दिव्यांग बांधवांना त्यांच्या हक्काचे पाच टक्के निधी वितरित करावा तसेच ग्रामपंचायत दोन वर्षापासून दिव्यांग बांधवांच्या निधीकडे दुर्लक्ष करत असून जर आठ दिवसात ग्रामपंचायतीने दिव्यांग बांधवांचा निधी वाटप न केल्यास लोकशाही मार्गाने उपोषण करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन दिले होते. त्या निवेदनाची दखल घेऊन ग्रामपंचायत ग्रामसेवक जयदीप सुरुशे यांनी निधीचे तात्काळ वाटप केल्याने अमजद पठाण यांच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याची भावना दिव्यांग बांधवांमध्ये दिसत आहे

## खोर येथील लोक वर्गणीमधून अंगणवाडीतील मुलांना गणवेश वाटप....

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

चिखली तालुक्यातील खोर या गावातील गावकऱ्यांनी एक नवीन आदर्श आपल्या तालुक्यासमोर उभा केला आहे, येथील गावकऱ्यांनी अंगणवाडीतील मुलांसाठी गाव वर्गणी करून रोख रक्कम 21 हजार रुपये जमा करून अंगणवाडीतील मुलांसाठी गणवेश घेऊन दिनांक 15 ऑगस्ट रोजी मुलांना गणवेश वाटप केले आहे. यावेळी लहान मुलांमध्ये एक उत्साहाचं वातावरण निर्माण झालं आहे. यावेळी सरपंच सौ.पुनमताई दिपक हाके, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गजानन धनवे सर,सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी , अंगणवाडी सेविका रेखाताई वाघ,लक्ष्मीबाई खंडारे,मदतनीस कल्पना नरवाडे, मालतताई जाधव,तसेच गावातील मंडळींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



खोर येथील सेवानिवृत्त शिक्षक सन्माननीय नारायण हाके सरांनी अंगणवाडीतील साहित्या करिता एकूण दोन हजार रुपये भेट दिली आहे. यावेळी अंगणवाडी शिक्षेकेसह गावकऱ्यांनी आभार मानले आहे.

खोर येथील आदर्श अंगणवाडी सेविका सौ.रेखाताई वाघ यांनी त्यांच्या टीमसहित गावकऱ्यांचे मनापासून आभार व्यक्त केले...

## अतिवृष्टीने पिकाचे प्रचंड नुकसान शासनाने त्वरित भरपाईची घोषणा करावी. (डॉ सुनील राऊत वनोजा.)

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

मंगरूळपिर:- तालुक्यातील अतिवृष्टी नुकसान भरपाई सरसगट द्यावी.मंगरुळपीर शिवसेनेच्या वतीने मागणी.मंगरुळपीर तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे वतीने नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिकाचे अतोनात नुकसान झाले असून काही शेतकऱ्यांच्या शेतात अक्षरशः पाणी होऊन तलावाचे स्वरूप आले आहे जवळ पास सर्वच शेतकऱ्यांच्या शेतातील पिके खरडून गेलीत अश्या तालुक्यातील सर्वच शेतकऱ्यांना सरसगट नुकसान भरपाई देण्यात यावी,याकरिता मंगरुळपीर तहसीलदार साहेब यांना निवेदन देण्यात आले.

या प्रसंगी मा. जिल्हा प्रमुख राजेश पाटील, तालुका प्रमुख रामदास पाटील सुर्वे,शहर प्रमुख सचिन परळीकर मंगरुळपीर तहसीलदार राठोड साहेब, तालुका संघटक बबनराव सावके प स सदस्य विलास लांबडे, उप तालुका प्रमुख भागवत शिंदे डॉ सुनील राऊत, दीपक उपाध्ये,संदीपान भगत, सुभाष शिंदे ज्ञानेश्वर वेव्हारे, युवासेना विधानसभा संपर्क प्रमुख अर्जुन सुर्वे, राऊत, उप शहर प्रमुख ज्ञानूसिंग भडांगे, बाळासाहेब,घोडचर संदीप परळीकर मंगेश युराळे सर्कल प्रमुख संगम कुरळे, सचिनभाऊ राऊत,दीपक वानखडे, बाळकृष्ण रोकडे संतोष भेंडेकर, संतोष लांबडे,पंकज राऊत, पुरुषोत्तम भुजाडे,संजय भुराळे, शेखर ठाकरे,गणेश राऊत, किशोर शेगोकार,ऋषिकेश जाधव, अरुण उजवाने, पत्रकार गणेश बोथे,साहेबराव बेंद्रे तालुक्यातील सर्व शेतकरी बांधव समस्त शिवसैनिक तथा सर्व तालुका पदाधिकारी बहुसंख्य उपस्थित होते.



## रत्नमाला संपत कापसे यांची निफाड नगरपंचायतच्या दुसऱ्यांदा नगराध्यक्षपदी विराजमान

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड नगरपंचायतच्या नगराध्यक्षपदावर रत्नमाला संपत कापसे यांची बिनविरोध निवड झाली आहे. माजी नगराध्यक्ष शारदा नंदकुमार कापसे यांनी ०६ ऑगस्ट २०२५ रोजी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. या रिक्त जागेसाठी १९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता निफाड नगरपंचायत सभागृहात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी पिठासीन अधिकारी विशाल नाईकवाडे तहसीलदार,मुख्याधिकारी धीरज भामरे त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात आली.

सदर निवडणुकीसाठी रत्नमाला संपत कापसे यांचाच एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. या वेळी उप नागराध्यक्ष अनिल कुंदे, नगर सेवक कविता धारराव, शारदा कापसे, विमल जाधव, सुलोचना होळकर, अरुंधती पवार, नयना निकाळे, अलका निकम, साहेबराव बर्डे, संदीप जेऊघाले, किशोर ढेपले, संदीप शिंदे,देवदत्त कापसे, ललित गिते, सोसायटी चेरमन हेमंत धारराव, रमेश जाधव, मुकुंद राजे होळकर, आसिफ पठाण, भाऊसाहेब कापसे, मोहन जाधव, नितीन धारराव, रावसाहेब माळोदे, साहेबराव कापसे, इरफान सय्यद, महेश चोरडिया, मनोज लुक्कड, सुहास सुरळीकर, सचिन खडताळे, स्वप्नील बिनायकीया, दीपक कुंदे, हरीश कर्डीले, सोमनाथ निकम, सागर कर्वे, विक्रम बागडे इ. सर्व उपस्थित होते. या निवडीमुळे नगरपंचायतीमध्ये आनंदाचे वातावरण असून, स्थानिक नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



रत्नमाला कापसे यांचा सामाजिक व राजकीय कार्याचा प्रदीर्घ अनुभव असून, त्या यापूर्वी विविध क्षेत्रांत सक्रिय राहिल्या आहेत. त्यांच्या कार्यकाळात निफाड नगरपंचायतीच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.






सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी स्पर्धेत सात थर लावल्याबद्दल निवी गोविंदा पथकाला पारितोषिक देताना कोकण स्थानिक संस्थेचे माजी आमदार अनिकेत भाई तटकरे यांच्यासमवेत राष्ट्रवादी युवक काँग्रेस युवानेते मनोज टके,चेतन टके, ध्रुव सोष्टे,सुशील टके, केतन भोय छायाचित्रात दिसत आहेत.

(छाया मोरेश्वर सगणे )

# सोशल मिडीया शस्त्रातून जनजागृती करा - एस. पी. नुरुल हसन

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा -**
**येथे "जिल्हा शांतता व सलोखा समिती" ची बैठक संपन्न ; ५०० हून पदाधिकारी उपस्थित**

**भंडारा** : "सोशल मिडीया एक असे शस्त्र आहे की, तात्काळ प्रशासनालाही दखल घ्यावी लागते. आज त्यावर लाखों युवक युवती आणि जनता आहे. यातूनच आपल्या शहरात कसा जातीय सलोखा कायम राहील यासाठी सोशल मिडीयातून विशेष जनजागृती करावी" असे आवाहन जिल्हा पोलीस अधिक्षक नुरुल हसन यांनी केले. ते भंडारा येथील पोलीस सभागृहात ( बुध. २० ऑगस्ट ) ला जिल्हा शांतता व सलोखा समितीच्या बैठकीत अध्यक्षपदी बोलतांना असे प्रतिपादन केले. याप्रसंगी जिल्ह्यातील सुमारे विविध पदाधिकारी आणि पत्रकार बांधव, सोशल मिडीयाचे संचालक उपस्थित होते.

पोळा, श्री गणेशोत्सव, ईद ए मिलाद या सण उत्सव काळात जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील गावात, शहरात जातीय सलोखा कायम रहावा यासाठी या शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी मंचावर जिल्हा पोलीस अधिक्षक नुरूल हसन, अतिरिक्त जिल्हाधिकारी रविंद जाधव, अप्पर पोलीस अधिक्षक निलेश मोरे, पवनी उपविभागीय पोलीस अधिकारी मनोज सिडाम, तुमसर उपविभागीय अधिकारी डॉ. कष्मिरा संखे, भंडारा ( गुन्हे शाखा ) पोलीस निरीक्षक संदीप माकोडे आदी मान्यवर उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात एसपी नुरूल हसन यांनी सांगितले की, आजच्या युगात सोशल मिडीया एक असे शस्त्र आहे की प्रशासनाला सुद्धा दखल घ्यावी लागते. कुठेही घटना घडली तर सर्वप्रथम सोशल मिडीयातून हल्लाबोल होतो. आज यावर लाखोंच्या संख्येने युवकांची फौज उभी आहे. त्यांनी आपल्या शहरात, गावातील विविध सामाजिक उपक्रम, अवैध धंदे त्यांवरील विरोध करणे, नशामुक्तीची जनजागृती करावी. तातडीने दखल घेतली जाईल. पुढे अतिथी म्हणाले की, मागे एका निवडणूकीच्या अती उत्साहात काहींकडून साकोलीमधे एका जागी थोर महापुरुषांच्या पुतळ्याची गुलाल भरवून विटंबना झाली होती. त्यांचे वृत्त तात्काळ एका "साकोली मिडीया" या व्हॉट्सअप वर झळकले होते. ती बाब भंडारा पर्यंत पोचली आणि तात्काळ साकोली पोलीस प्रशासनाने दखल घेत त्या पुतळ्याची त्वरीत स्वच्छता करीत माल्यार्पण केले व मानवंदना दिली. अशीच जनजागृती सोशल मिडीयातून केली तर जनता सुद्धा जागरूक होणार. आपण सर्व सर्वधर्म समभावाचे नागरिक असून सोशल मिडीयातून अफवांच्या प्रसारणावर विश्वास ठेवू नये. सण उत्सव काळात संपूर्ण भंडारा जिल्हा पोलिस तुम्हा सामान्य जनतेसोबत खंबीरपणे उभी आहे. पोलीसांवर विश्वास ठेवा. धार्मिक स्थळांवर व परीसरात अवैध दारू विक्री, गांजा, डोडा अश्या विषारी पदार्थांची विक्री आढळून आल्यास तातडीने जवळील पोलीस ठाणे येथे जाऊन कळवा, त्या दोषींवर जलदगतीची दंडात्मक कारवाई केली जाईल अशी भंडारा पोलीस हमी देत आहे. यावेळी पत्रकार गोपालकृष्ण मांडवटकर, कल्याणी भुरे, राशिद कुरैशी, डी. जी. रंगारी यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. येथे जिल्हा पोलीस अधिक्षक नुरूल हसन यांनी मंचावरून उतरताच आवर्जून "साकोली मिडीया" चे संचालक आशिष चेडगे यांची भेट घेतली व त्यांच्या सोशल मिडीया तातडीने जनजागृतीवर प्रशंसा करीत हस्तांदोलन केले हे उल्लेखनीय. या शांतता समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील पोलीस पाटील, तंटामुक्त समिती पदाधिकारी, महिला सुरक्षा समिती, जातीय सलोखा समिती, कौमी एकता समिती, गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, ईद ए मिलाद उत्सवाचे पदाधिकारी व सुमारे ५०० हून अधिक सामाजिक कार्यकर्ता आणि ग्रामीण क्षेत्रातील त्या त्या ग्रामपंचायतचे सदस्य आणि विविध समित्यांचे पदाधिकारी सदस्यगण हजर झाले होते.




## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वतीने एन एच आय चे अधीकारी जवादे यांना दीले निवेदन.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

वाशिम:- दिनांक 19. 8 .2025.रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष राजू पाटील किड्से यांच्या नेतृत्वामध्ये वाशिम शहरांमधून जाणारा चार पदरी रस्ता हा निष्कृष्ट दर्जाचा होत असल्यामुळे एन एच आय चे अधिकारी जवादे यांना निवेदन देऊन हा रोड दर्जेदार बनवण्यात यावा अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने काम बंद करण्यात येईल व भव्य आंदोलन करण्यात येईलअसा इशारा निवेदनात देण्यात आला निवेदन देतावेळेस महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते त्या मध्ये वाहतूक सेना जिल्हा अध्यक्ष तथा जिल्हा सचिव गजानन वैरागडे वाहतूक सेना शहराध्यक्ष वाशिम उमेश टोलमारे वाहतूक सेना शहराध्यक्ष मंगरूळनाथ शाम कव्हर इत्यादी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी यांच्या उपस्थित हे निवेदन देण्यात आले.



## बाळासाहेब देवरस प्राथमिक विद्यामंदिर चिखली येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा.

### संस्थेचे विश्वस्त आदरणीय गोपालराव शेटे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न..

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

चिखली (बुलढाणा)येथील बाळासाहेब देवरस प्राथमिक विद्यामंदिर येथे दि.15 ऑगस्ट या दिवशी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी सर्व विद्यार्थी मैदानात जमले होते,स्थानिक बाळासाहेब देवरस प्राथमिक विद्यामंदिर चिखली येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

"ध्वजारोहण" संस्थेचे विश्वस्त गोपालराव शेटे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.याप्रसंगी प्रामुख्याने बालाजी अर्बन परिवाराचे उपाध्यक्ष सत्यनारायणजी लढ्ढा व संस्थेचे सहसचिव नारायणराव भवर उपस्थित होते,ध्वजारोहणा नंतर सत्यनारायणजी लढ्ढा यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या तसेच गोपालराव शेटे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन तुळशी वनस्पतीचे महत्त्व सांगितले व घरोघरी तुळशी लावण्याचे आवाहन केले, यावेळी बऱ्याच मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बदर सर यांनी तर आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक पारवे सर यांनी केले,यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चौकट....

बाळासाहेब देवरस प्राथमिक विद्यामंदिर अंतर्गत कल्पतरू इंग्लिश स्कूल येथील नर्सरी,के जी वन.के जी टू च्या लहान मुलांनी बहरदार असे नृत्य,भाषण सादर करून समोर बसलेल्या जनसमुदायांचे मन जिंकले यावेळी मुलांचे कौतुक करत असताना तेथील शिक्षकेचे सुद्धा मान्यवरानीं मोठ्या प्रमाणात कौतुक केले आहे.



## किनवट तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून हेक्टरी 50 हजार रू मदत जाहीर करा.



**दैनिक युवक आधार**
**किनवट. प्रतिनिधी दिलीप भालेराव**

, गेल्या चार दिवसापासून किनवट तालुक्यात पावसाने प्रचंड थैमान घातले आहे. आस्मानी संकटातून शेतकरी कष्टकऱ्यांना दिलासा म्हणून हेक्टरी 50 हजार रु मदत म्हणून सरकारने जाहीर करावी अतिवृष्टी पावसात वाहून गेलेल्या व दगावलेल्या जनावरांना 1 लाख रू मदत करा. अतिवृष्टीने पडझड झालेल्या घराचे संपूर्ण पुर्नवसन करा. अशा अनेक मागण्याचे अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने नायक तहसिलदार साहेब किनवट यांना निवेदन देण्यात आले. कॉ. अर्जुन आडे, कॉ. जनार्धन काळे, कॉ. आडेलू बोनगीर, कॉ. शेषेराव ढोले, कॉ. शिवाजी किरवले, कॉ. शेख चाँद , कॉ. शेख फरिद बाबा, कॉ. नंदकुमार मोदुकवार यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

## "स्व. झुलनबाई बहुउद्देशीय संस्था अंतर्गत सतनाम व्यसनमुक्ती केंद्रात सचिनभाऊ बन्सोड यांच्याकडून फळवाटप

**दैनिक युवक आधार**
**गोंदिया वार्ताहर**

स्व. झुलनबाई बहुउद्देशीय संस्था अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या सतनाम व्यसनमुक्ती केंद्रात सचिनभाऊ बन्सोड यांनी आपल्या मुलाच्या सार्थक बन्सोड पहिल्या वाढदिवसानिमित्त फळवाटप केले. या प्रसंगी कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच संस्थेला पुस्तकांचेही वितरण करण्यात आले.

वाढदिवस मोठ्या प्रमाणात साजरा न करता, लोकसेवेच्या माध्यमातून समाजाला काहीतरी परत देण्याचे आपले कर्तव्य आहे, हेच या उपक्रमातून त्यांनी दाखवून दिले. व्यसनमुक्ती केंद्रातील रुग्णांशी संवाद साधत त्यांच्यासाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष. गणेश नाडेकर प्रमुख उपस्थिती, चिर्वतकर सर, निखिल बन्सोड ,पत्रकार मनोज पटले, मदन राऊत ,सारिका ब्राह्मणकर आणि कीर्ती शिवणकर यांची उपस्थिती होती.





# भर पावसातही शुभंकरोति साहित्य परिवारचा एक दिवसीय कार्यक्रम थाटामाटात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**

साहित्य यज्ञ हेच आमचे ध्येय असलेल्या शुभंकरोति साहित्य परिवारतर्फे रविवार दि.१७ ऑगस्ट २०२५ रोजी दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र मुंबई येथे राज्यस्तरीय गझल कार्यशाळा, शुभंकरोति गुणगौरव पुरस्कार, पुस्तक प्रकाशन आणि गझल मुशायरा आयोजित करण्यात आले होते.

संमेलनाध्यक्षपद मा. हेमंत सुधाकर सामंत यांनी भूषवले होते तर मा. नीलकंठ श्रीखंडे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे महायोजक मा. श्री. राजीव श्रीखंडे, प्रमुख मान्यवर मा. श्री. गुलराज सिंग (ढगे), गझल मुशायऱ्याचे अध्यक्ष मा. आप्पा ठाकूर तसेच संस्थेच्या संस्थापिका मा. सौ. सोनाली जगताप, प्रशासक मा. जयंत शिगवण, मा. किरण वेताळ, मा. अंकिता गायकवाड इत्यादी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने आणि त्यानंतर मा. सौ. सोनाली जगताप यांच्या ईशस्तवनाने झाली.

त्यानंतर संमेलन अध्यक्ष श्री. हेमंत



सुधाकर सामंत यांची सौ. सोनाली जगताप व श्री. सुहास जगताप यांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

त्यानंतर मा. स्वाती पोळ यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. सर्व मान्यवरांनाही शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

त्यानंतरच्या गझल मुशायरा या सत्रात मा. किरण वेताळ यांनी मा. श्री ए. के. शेख सरांनी जुलै महिन्यात घेतलेल्या गझल कार्यशाळेचा आढावा घेतला.

या कार्यशाळेत सहभाग घेतलेले मा. शिल्पा चऱ्हाटे, मा. सोनाली जगताप, मा. गौरी पंडित, मा. दिपाली घाडगे, मा. अंकिता गायकवाड यांनी आपली स्वलिखित गझल सादर केली. मा. राधिका भांडारकर यांनी मा. अरुणा मुल्हेरकर यांची गझल सादर केली तर मा. सुनील पारेख यांनी गुजराती गझल सादर केली.

या क्षेत्राचे सूत्रसंचालन मा. दिपाली घाडगे यांनी केले. त्याचवेळी सुप्रसिद्ध कवयित्री मा. रेश्मा कारखानीस यांचे अवचित आगमन झाले. त्यांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले व एक सुंदर गझल सादर केली.

मा. जीतू आर म्हात्रे यांनी पण एक सुंदर गझल सादर केली

त्यानंतर मा. सुहास जगताप व मान्यवर सुप्रसिद्ध संगीतकार गुलराज सिंग (ढगे) आणि गझल गायक आदित्य कडतने या तिन युवकांनी आपल्या सुमधुर आवाजात गझला गाऊन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

पुढील सत्रात मा. शिल्पा चऱ्हाटे यांचे "भेट तुझी माझी" आणि ऋचा पारेख यांचे "आत्मायन" या दोन पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

त्यानंतरच्या सत्रात मा. हेमांगी नेरकर, मा. प्रकाश राणे, मा. विसुभाऊ बापट, मा. निखिल कोलते, मा. वैभव धनावडे, मा. प्रमोद सूर्यवंशी, मा. सुनील पारेख, मा. आदित्य कडतने, मा. जयंत शिगवण, मा. डॉक्टर अलका नाईक, मा. विजय जोशी (विजो), मा. किरण वेताळ, मा. सुरेश पवार, मा. मनोज वराडे, मा. राजीव श्रीखंडे, मा. अस्मिता चौधरी, मा. सदानंद डबीर, मा. रुपेश मुरुडकर, मा. जितू म्हात्रे, मा. पल्लवी सरमरकर, मा. भक्ती भोसले यांना मान्यवरांच्या हस्ते *शुभंकरोति गुणगौरव पुरस्कार* प्रदान करून गौरवण्यात आले.

या सत्राचे अतिशय उत्कृष्ट असे सूत्रसंचालन मा. जितू म्हात्रे, मा. शिल्पा चऱ्हाटे, मा. स्वाती पोळ आणि मा. दिपाली घाडगे यांनी केले.

कोकण विभाग पत्रकार संघातर्फे मा. सौ. सोनाली जगताप यांना मा. पत्रकार रवींद्र यशवंतराव (देशमुख) यांच्या हस्ते तसेच मा. मनोज वराडे, डॉक्टर सुभाष कटकदौंड, मा. डॉक्टर अलका नाईक यांच्या हस्ते *साहित्य सरिता पुरस्कार* देऊन सन्मानित करण्यात आले.

त्यानंतर मा. हेमंत सुधाकर सामंत सरांचे अध्यक्षीय भाषण अतिशय प्रबोधन देणारे होते.

पुढील सत्रात मा. गझलकार आप्पा ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली गझल मुशायरा रंगला. यात मा. कल्पना गवरे, मा. नंदू सावंत, मा. रवींद्र यशवंतराव (देशमुख), मा. मनोज वराडे, मा. प्रतिभा सराफ, मा. सौ. स्मिता हर्डीकर, मा. राधिका भांडारकर, मा. डॉक्टर सुभाष कटकदौंड, मा. कमलाकर राऊत, मा. निशा वर्तक, मा. मानसी म्हसकर, मा. किरण वेताळ या निमंत्रित गझलकारांनी आपल्या बहारदार गजला सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली. याचे सूत्रसंचालन मा. किरण वेताळ यांनी केले.

मा. आप्पा ठाकूर यांची प्रत्येक गझल मनाला भुरळ घालत होती. त्यांची सुप्रसिद्ध गझल करार बाकी आहे आणि विठ्ठलाची गझल ऐकून प्रेक्षक भारावून गेले.

सर्व दिगजांच्या आगमनाने सारे वातावरण भारावून गेले होते.

मा. अंकिता गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केल्यावर राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला

## नायगाव येथे शिवसेना (उबाठा) पक्षाची शाखा स्थापन...

### जिल्हाप्रमुख महेश नळगे व तालुकाप्रमुख प्रदिप बोराडे यांच्या नेतृत्वाखाली युवकांनी घेतली हाती मशाल !

**दैनिक युवक आधार मंठा प्रतिनिधीः-**

नायगाव ता.मंठा येथे शिवसेनेचे (उबाठा) गटाचे जिल्हाप्रमुख महेश नळगे व तालुकाप्रमुख प्रदिप बोराडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत मतदार संघातील अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेची मशाल हाती घेत शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला. महेश नळगे जिल्हाप्रमुख व प्रदिप बोराडे तालुकाप्रमुख झाल्यानंतर परतुर मंठा विधानसभा मतदारसंघाला रोखठोक असे युवा नेतृत्व लाभले असल्याचे मतदार संघातील प्रत्येक मतदार बोलत आहेत.

मतदार संघातील सामान्य नागरिक आपली अडचण घेऊन जिल्हाप्रमुख श्री नळगे व तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांच्या कडे गेल्यावर तत्काळ त्यांच्यासाठी झटणारे नेतृत्व पहावयास मिळत आहे. त्यांच्या परखड व रोखठोक भूमिकेमुळे विधानसभा मतदारसंघातून आजी माजी



सरपंच,ग्रामपंचायत सदस्य तसेच इतर पक्षातील पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करित असल्याने विरोधकांचे धाबे दणाणले आहेत.

नायगावयेथीलशाखास्थापनेच्यावेळीतालुका संघटक ज्ञानेश्वर सरकटे,उपतालुकाप्रमुख संजय नागरे,उपतालुकाप्रमुख देवीदास खरात,अशोक खंदारे, गोरख चव्हाण,सचिन चव्हाण, विजय वाघमारे, निलेश बोराडे,आदिराज बोराडे नायगाव शाखाप्रमुख रवींद्र राठोड,राजू जुमडे,शरद वाव्हळे, राजेश आढे, शिवकुमार देशमुख,सचिव मारुती,खंदारे ऋषी,दराडे, भारत राठोड,अविनाश राठोड,महेश राठोड,कृष्णा घोगरे,कृष्णा फुफाटे,प्रदीप वाव्हळे, जय सुतार,अमोल राठोड, संदीप चव्हाण,लक्ष्मण फुफाटे, बाळू चिफडे, अनिल दहिजे,सचिन राठोड,प्रसाद वाव्हळे,विक्रम राठोड,योगेश उपाटे,कांताराम पवार,सतीश प्रधान, लक्ष्मण कोकाटे,प्रतीक सुतार,आकाश प्रधान, राजकुमार राठोड,रामेश्वर राठोड, रवींद्र आढे,राहुल चव्हाण,महादेव चव्हाण,गजानन फुपाटे,रामेश्वर फुपाटे, मारुती फुपाटे,नितीन राठोड, अमोल आढे,रवी चव्हाण,अनिल राठोड,नितीन राठोड,रवि राठोड,रंजीत राठोड,संदीप राठोड,जानकीराम राठोड, गोपाळ राठोड, संजय चव्हाण, समाधान राठोड, पृथ्वीराज चव्हाण,संतोष मिरासे यांची उपस्थिती होती.

## अतिवृष्टीने पिकाचे प्रचंड नुकसान शासनाने त्वरित भरपाईची घोषणा करावी. (डॉ सुनील राऊत वनोजा.)

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

मंगरूळपिरः- तालुक्यातील अतिवृष्टी नुकसान भरपाई सरसगट द्यावी.मंगरुळपीर शिवसेनेच्या वतीने मागणी.मंगरुळपीर तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे वतीने नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिकाचे अतोनात नुकसान झाले असून काही शेतकऱ्यांच्या शेतात अक्षरशः पाणी होऊन तलावाचे स्वरूप आले आहे जवळ पास सर्वच शेतकऱ्यांच्या शेतातील पिके खरडून गेलीत अश्या तालुक्यातील सर्वच शेतकऱ्यांना सरसगट नुकसान भरपाई देण्यात यावी,याकरिता मंगरुळपीर तहसीलदार साहेब यांना निवेदन देण्यात आले.

या प्रसंगी मा. जिल्हा प्रमुख राजेश पाटील, तालुका प्रमुख रामदास पाटील सुर्वे,शहर प्रमुख सचिन परळीकर मंगरुळपीर तहसीलदार राठोड साहेब, तालुका संघटक बबनराव सावके प स सदस्य विलास लांबडे, उप तालुका प्रमुख भागवत शिंदे डॉ सुनील राऊत, दीपक उपाध्ये,संदीपान भगत, सुभाष शिंदे ज्ञानेश्वर वेव्हारे, युवासेना विधानसभा संपर्क प्रमुख अर्जुन सुर्वे, राऊत, उप शहर प्रमुख ज्ञानूसिंग भडांगे, बाळासाहेब,घोडचर संदीप परळीकर मंगेश युराळे सर्कल प्रमुख संगम कुरळे, सचिनभाऊ राऊत,दीपक वानखडे, बाळकृष्ण रोकडे संतोष भेंडेकर, संतोष लांबडे,पंकज राऊत, पुरुषोत्तम भुजाडे,संजय भुराळे, शेखर ठाकरे,गणेश राऊत, किशोर शेगोकार,ऋषिकेश जाधव, अरुण उजवाने, पत्रकार गणेश बोथे,साहेबराव बेंद्रे तालुक्यातील सर्व शेतकरी बांधव समस्त शिवसैनिक तथा सर्व तालुका पदाधिकारी बहुसंख्य उपस्थित होते.

## रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांचा शेतीपिकाचे मदतीसाठी एल्गार




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रिसोड. रणजीत सिंह ठाकुर**

रिसोड तालुक्यातील अतिवृष्टी व संततधार पडणा-या पाऊसामुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीला सरसकट मदत मिळणण्यासाठी दिनांक १४/०८/२०२५ पासून रिसोड तालुक्यात सतत आज दि.२० ऑगष्ट पर्यंत ढगफुटी सदृश्य पाऊस व संतत सुरु असुन त्यामुळे नदी नाले पूर्ण क्षमतेने वाहत असल्यामुळे व संततधार पाऊस सुरु असल्यामुळे शेत पिकाचे संपूर्ण नुकसान झालेले असुन पुराच्या पाण्यामुळे सिंचनाच्या सोईसाठी शेतात असलेल्या साहित्याची संपूर्ण नासाडी झालेली आहे.आणी साहित्य अतिवृष्टीमुळे वाहुन गेले.रिसोड तालुक्यातील काही महसूल मंडळ तांत्रीक निकषात बसत आहे, व काही महसुल मंडळे उदाः कवठा, रिठद, गोवर्धन ईत्यादी मंडळे अतिवृष्टीच्या व संततधार पावसाच्या तांत्रीक निकषात बसत नसल्याची माहिती महसूल विभागाकडून मिळत आहे.व त्याबाबत शेतकऱ्यांमध्ये चर्चा होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तिव्र नाराजी पसरली असल्याने भावना तिव्र झाल्यावर या तिन्ही महसुली मंडळातील शेतकऱ्यांनी आपले निवेदन रिसोड तहसीलदार यांचे मार्फत जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस मॅडम वाशिम व वाशिम जिल्हा पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांना दिले आहे.अशा परिस्थितीत शेतकरी अडकला आहे.म महसुली विभागाने जी परिस्थिती कागदावर दाखवली ती चुकीची आहे.परंतु प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे सदर मंडळामध्ये शेतकऱ्यांचे संपूर्ण शेत पिकांचे नुकसान झाले असून उभ्या असलेल्या शेतपिकावर बुरशी जन्य रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रार्दुभाव वाढला आहे व त्यामुळे उर्वरित पिके शेतकऱ्यांच्या हातातुन जात आहेत. तसेच शेत रस्ते सुध्दा खरडुन गेले आहे व घरांची सुध्दा मोठया प्रमाणात पडझड झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घेतलेले पिक कर्ज भरणे शक्य नाही. त्यामुळे संपूर्ण पिक कर्ज माफी करून अतिवृष्टी व संततधार पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना सरसकट भरीव मदत जाहिर करावी अन्यथा वंचीत राहणारे सर्व शेतकरी शासना विरोधात तिव्र आंदोलन करतील याची प्रशासनानी नोंद घ्यावी. अशी निवेदनात म्हटले आहे.निवेदन दि.२० ऑगष्ट २०२५ रोजी दिले आहे.

या निवेदनावर घनश्याम मापारी, नारायण आरु, रामेश्वर रंजवे, पुरुषोत्तम रंजवे, शिवाजी सोनुने, प्रदीप देशमुख अशोक चोपडे, गजानन साळेगावकर,भुजंग मांडे, भुजंन सरकटे, नाथा शिंदे, ज्ञानेश्वर सरकटे,सतीश इंगोले, संजय शिंदे, प्रभू रंजवे, रमेश रंजवे,भागवत रंजवे, महादेव लांडगे, कैलास लांडगे, सिताराम गवळी, संतोष रंजवे, कडूजी हागे लक्ष्मण हागे सरपंच (भोकरखेडा,रायताळ वाडी) रामभाऊ मोरे, नामदेव कालापाड, शिवाजी इंगोले, गणेश देव्हडे, दत्तराव इंगोले इत्यादी शेतकऱ्यांच्या सह्या आहेत. यावेळी बहुसंख्येने शेतकरी निवेदन देतांना उपस्थित होते.

## युवा परिवर्तन पत्रकार संघ फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य कार्यकारणी जाहीर ,विविध पद नियुक्ती जाहीर



**दैनिक युवक आधार**
**पुसद वार्ताहर**

युवा परिवर्तन पत्रकार संघ फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य, शाखा पुसदच्या वतीने आज दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी पुसद येथील शासकीय विश्रामगृहावर बऱ्याच पत्रकार बांधवांची संघटनेच्या विविध पदावर नियुक्ती करण्यात आली, यात दिग्रस तालुकाध्यक्षपदी सन्माननीय श्री प्रशांतजी सुभाष राठोड रा.वरदळी ता.दिग्रस तथा पुसद तालुकाध्यक्षपदी सन्माननीय श्री सुनील गंगाखेडे यासह तसेच महागाव तालुकाध्यक्षपदी सन्माननीय श्री उत्तमरावजी मेटकर तसेच जिल्हा सरचिटणीस पदी अरुण भाऊ बरडे यांची नियुक्ती करण्यात आली, या वेळेस उपस्थित प्रमुख पदादिकारी नावे मा.जी सभापती तथा प्रदेश प्रसद्धि प्रमुख नरेंद्र खंदारे अजीज शेख प्रकाश हारके प्रभाकर शिंदे केलास वाकोडे जिल्हा अध्यक्ष श्री कृष्ण काशिनाथ खडसे समाधान वाढे उत्तमराव मेटकर श्री.ढोले भाऊ जयपाल राठोड पवन चव्हाण भारत जोगदडे विजय वाघमारे प्रेमसिंग नदु चव्हाण शोशाधन ढोले दिलीप भाऊ धुळ विनय वाघमारे मोहम्मद हनीफ़ शारिक इमाम शेख आणि यावेळी बऱ्याच पत्रकार बांधवाची उपस्थिती होती, या नियुक्ती प्रसंगी खेळीमेळीच्या वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली,

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सेवापूर्ती सोहळ्यात समाजाला दिशा देणाऱ्या शिक्षकांचा गौरव

## राजू ढोके यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा थाटात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी**

शिक्षक म्हणजे समाजाला योग्य दिशा देणारा दीपस्तंभ. शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविण्याचे पवित्र कार्य ज्यांनी आयुष्यभर हाती घेतले, असे उच्च श्रेणी मुख्याध्यापक राजू ढोके यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात व हृदयस्पर्शी वातावरणात पार पडला.

३६ वर्षांच्या दीर्घ सेवेनंतर ३१ जुलै रोजी ते डेहणी येथून सेवानिवृत्त झाले असून, त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी दिग्रस येथे सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला व्यसनमुक्ती सम्राट हभप मधुकर महाराज खोडे यांची मुख्य उपस्थिती लाभली. तर अध्यक्षस्थानी जिल्हा नियोजन समिती सदस्य सुधीर देशमुख होते. शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद पुणे डॉ. सुचिता



पाटेकर, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी प्रमोद सूर्यवंशी, सेवानिवृत्त सहाय्यक गट विकास अधिकारी किशोर गोळे, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी शुभदा पाटील, केंद्रप्रमुख किरण बारशे, राजू ढोके आणि सौ. सुनीता ढोके मंचावर उपस्थित होते.

आपल्या प्रभावी मार्गदर्शनपर भाषणात हभप मधुकर महाराज खोडे म्हणाले की, "समाजाच्या तिरस्कारातूनच पुरस्काराची वाट सोपी होत असते. गुरु म्हणजे प्रकाश, अंधारातून प्रकाशाकडे नेणारी शक्ती. गुरुने दिलेल्या धड्यातून विद्यार्थी घडतो आणि त्या विद्यार्थ्यातूनच समाजाची घडण होते. शिक्षणाची दिशा देणारा चांगला शिक्षक मुलांच्या आयुष्याची दशा संपवू शकतो. मुलं ही देशाची खरी संपत्ती असून त्यांना घडविण्याचे मोठे कार्य शिक्षक करतात. आज समाजाला दिशा देणाऱ्या शिक्षकांची नितांत आवश्यकता आहे." त्यांच्या या प्रभावी विचारांनी कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्व श्रोत्यांना प्रेरणादायी ऊर्जा दिली.

महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. अभियंता यश ढोके यांनी प्रास्ताविक केले. अजय तुंडलवार यांचेसह मंचावरील सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ संस्कृती ढोके यांनी सर्वांचे आभार मानले. मयुरी ढोके, राजू ढोले, श्रीरंग ढोके, श्रेयस फाले, श्रीकांत ढोके, हरिदास घोरपडे, प्रशांत ढोके यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. या सोहळ्याला परिसरातील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, नातलग आणि नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते. संपूर्ण सोहळा हृदयस्पर्शी व भावनिक वातावरणात पार पडला. शेवटी राजू ढोके यांना दीर्घायुष्य व निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा देत कार्यक्रमाची सांगता झाली.

**शिक्षकांचा गौरव!**

राजू ढोके यांच्या सेवापूर्ती कृतज्ञता सोहळ्यात सेवापूर्ती निमित्त केवळ राजू ढोके यांचाच नव्हे तर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रा. डॉ. रविभूषण कदम, प्रफुल्ल निलावार, अमर जाधव, नितीन डहाके, अतुल मैंद या शिक्षकांचाही सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कृतज्ञतेसह प्रेरणा देणारा हा सोहळा ठरल्याने उपस्थित सर्वच प्रभावित झाले. उपस्थित मान्यवरांनी राजू ढोके यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरही शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात सक्रिय राहावं, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# 27 गाव प्रकल्पग्रस्त समिती कोणतीही फुट पडली नसल्याचा अध्यक्षांचा दावा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: 27 गाव प्रकल्पग्रस्त समितीत कोणतीही फूट पडली नसल्याचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी यांनी पत्रकारांना सांगितले. यावेळी दिबा पाटील यांचेच नाव विमानतळाला लागणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



नवी मुंबई विमानतळ बाधित ग्रामस्थांनी एकत्र येत 27 गाव प्रकल्पग्रस्त समितीची स्थापना केली. या समितीमार्फत विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव लागावे यासाठी गेल्या काही वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत. तसेच ही समिती विमानतळावर स्थानिक प्रकल्पग्रस्त नागरिक कामाला लागले पाहिजेत ही भूमिका घेऊन त्यांनी त्या पद्धतीने काम देखील सुरू केले आहे. मात्र एखादी दुसरी व्यक्ती राजकारण करून संघटनेला बदनाम करत असेल तर अशांवर कारवाईची मागणी केली असल्याचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी यांनी सांगितले. सचिन केणी यांच्याकडून केवळ सोशल मीडियावर राजीनामा पाठवण्यात आला आहे. या राजीनामा दिलेल्या पत्रातील बऱ्याचशा सह्या खोटे असून त्यातील बहुतांशी संघटनेचे सदस्य नसल्याचे कार्याध्यक्ष रुपेश धुमाळ यांनी सांगितले. या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली असल्याचे धुमाळ यांनी सांगितले. तर 27 गाव प्रकल्पग्रस्त समिती ही अभेद्य असल्याचे प्रेम पाटील यांनी शेवटी सांगितले.

# राळेगाव पोलिसांचा गावठी दारूच्या हातभट्टी वर पोलिसांचा छापा

## ५० हजारांचा मुद्देमालासह दोन आरोपी अटकेत

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :-जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-** पोलिसांनी गावठी दारूच्या हातभट्टीवर छापा टाकून दोन आरोपींना रंगेहात पकडले.या कारवाईत तब्बल ५० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन्ही आरोपींवर दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार दिनांक १९ ऑगस्ट मंगळवार रोजी सकाळी सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश दंदे, पीएसआय विशाल बोरकर,पोलीस अंमलदार विशाल कोवे,प्रतीक्षा तिथरमारे,हे राळेगाव पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की पिंपळखुटी तलाव परिसरात गावठी दारू विक्री सुरू आहे.त्यानुसार पोलिस पथकाने दोन पंचांच्या उपस्थितीत छापा टाकला असता,तेथे शेषराव हिरवा चव्हाण राहणार जोडमोहा हा गावठी दारू काढताना मिळून आला.त्याच्या ताब्यातून ५ लिटर तयार गावठी दारू किंमत ५०० रुपये व ५० लिटर मोहफुलाचा सडवा किंमत ५ हजार रुपये असा एकूण ५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर ग्राम सोयटी शिवार परिसरात पुन्हा छापा मारला असता, तेथे नूतन नरेश काळे हा इसम गावठी दारू गाळतांना आढळला. त्याच्या ताब्यातील चार ड्रमामध्ये अंदाजे ४५० लिटर मोहाचा सडवा दारू बनविण्यासाठी साठवलेला आढळून आला.या मुद्देमालाची किंमत तब्बल ४५ हजार रुपये एवढी आहे.सदर कारवाईदरम्यान पंचनामा करून मुद्देमाल जप्त करण्यात आला,तसेच उर्वरित मुद्देमाल जागेवरच नष्ट करण्यात आला.दोन्ही आरोपींवर दारूबंदी कायद्यांन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.सदरची ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यवतमाळ,अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यवतमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बंसल पांढरकवडा यांच्या मार्गदर्शनाखाली राळेगाव पोलीस स्टेशनच्या पोलिस निरीक्षक शितल मालते यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश दंदे,पोलीस उपनिरीक्षक विशाल बोरकर,पोलीस अंमलदार विशाल कोवे व प्रतीक्षा तिथरमारे यांनी केली आहे.



# आष्टी येथून श्री नागनाथ यात्रा कंपनी कडून महिला भंडारदरा ट्रिप

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे**

आष्टी येथुन श्री नागनाथ यात्रा कंपनी हिरडगाव श्री दत्तात्रेय साळुंके महाराज, श्री राम साळुंके व श्री अनिल साळुंके व सौ राजश्री भारत दळवी यांनी भंडारदरा ट्रीप चे आयोजन केले 15 ,8,2025,या रात्री आष्टी येथुन झुंजार नारी ग्रुपचे अध्यक्षा सौ मनिषा महेश चवरे व मेकअप आर्टिस्ट मोहिनी पोकळे,अश्विनी वाघुले,सुवर्णा पवार, मीनाक्षी भोसले मॅडम,सविता गोरे मॅडम,रजनी खाडे,सारिका थोरवे,अमृता भराटे,जयश्री दळवी,स्वाती धोंडे,मंजुषा भुकन ,सुरेखा राऊत मॅडम,कोमल मस्के,अंबिका



चौधरी, अश्विनी होळकर मॅडम,वर्षा सांगळे, मंगल चौधरी,सुरेखा थोरवे व ट्रीपचे नियोजन करणारे सौ राजश्री भारत दळवी मॅडम यांनी खुप छान नियोजन करून श्रावण महिन्यात स्पेशल भंडारदरा ट्रीप वर्ष 2 रे यशस्वी करून फुल एन्जॉय आष्टीतील महिलांनी केला असून सर्व महिला खूप खुश आहेत रविवारी पहाटे भंडारदरा ट्रिप सुखरूप परत आली आहे या दिवसात ट्रिप मधील महिला फक्त आणि फक्त स्वतःसाठी जगल्या

आष्टीतील महिलांचा भंडारदरा येथे खूप एन्जॉय सर्व महिलांचे मी सौ राजश्री भारत दळवी आमच्या श्री नागनाथ यात्रा कंपनीकडून धन्यवाद मानते यापुढेही असीच साथ द्या बाई बाई पण भारी देवा.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण – लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाने होणारच!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी )**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यासाठी उभारण्यात आलेल्या चळवळीबाबत काही अनावश्यक आक्षेप नोंदवले जात आहेत.

या संदर्भात ठाम विश्वास आहे की केंद्र सरकार विमानतळ सुरू होण्यापूर्वीच नामकरणाचा निर्णय घेईल. या चळवळीला केंद्र सरकारकडून नेहमीच सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे आणि स्थानिकांची भावना सन्मानाने मान्य केली जाईल.

हेही लक्षात ठेवले पाहिजे की, आज आक्षेप घेणारे लोक त्यावेळी आंदोलनाला पाठिंबा देत नव्हते, जेव्हा तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने या नामकरण चळवळीला मारक ठरणारा निर्णय घेण्याचा प्रयत्न केला होता. त्या काळात ते मौन बाळगत होते, हे सर्व जनतेला माहीत आहे. याशिवाय, या संदर्भातील समितीचे अध्यक्ष हे तटस्थ असणे अपेक्षित असताना त्यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमदार श्री. महेश बालदी यांच्या विरोधात भूमिका घेतली होती. श्री. बालदी यांनी या नामकरणासाठी झालेल्या सर्व आंदोलने उर्जेने पुढे नेली, अगदी त्यासाठी त्यांना खटलेसुद्धा भोगावे लागले. अशा व्यक्तीच्या प्रयत्नांना नाकारणे आणि त्यांच्या विरोधात भूमिका घेणे हा सरळसरळ राजकीय हेतू आहे.

– लोकनेते दि. बा. पाटील यांचे योगदान आणि जनतेची भावना लक्षात घेऊन हा विमानतळ त्यांच्याच नावाने होणार, यात कोणतीही शंका नाही. हे नामकरण केवळ एका पक्षाचे वा नेत्याचे नसून, संपूर्ण रायगड जिल्ह्याच्या भावनांचा आणि जनतेच्या हक्कांचा विषय आहे.

– प्रशांत ठाकूर
आमदार, भाजप – पनवेल विधानसभा

# बाप्पाच्या स्वागतासोबतच सुरक्षेला प्राधान्य द्या:

## गणेशोत्सव मंडळांना महावितरणचे आवाहन!

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू प्रतिनिधी नागपूर विभाग**

नागपूर, दि. 18 ऑगस्ट 2025 - महाराष्ट्राचे आराध्य दैवत गणपती बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा होणाऱ्या या उत्सवामध्ये कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी महावितरणने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना वीज सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. तुमच्या आनंदात कुठलेही विघ्न येऊ नये, यासाठी अधिकृत आणि सुरक्षित वीज जोडणी घेणे किती महत्त्वाचे आहे, हे महावितरणने स्पष्ट केले आहे.

घरगुती दरात अधिकृत जोडणी: सुरक्षा आणि बचतीचा दुहेरी फायदा

महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवाला महाराष्ट्राचा राज्य उत्सव म्हणुन नुकतेच घोषित केले आहे. सार्वजनिक उत्सव आनंददायी आणि सुरक्षित करण्यासाठी, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने सार्वजनिक उत्सवांसाठी तात्पुरत्या वीज जोडणीसाठी घरगुती दराचे वीजदर निश्चित केले आहेत. यामुळे मंडळांनी अनधिकृत जोडण्या टाळाव्यात आणि अधिकृत वीजपुरवठा घ्यावा. यामुळे होणाऱ्या संभाव्य अपघातांचा धोका टाळता येतो. मंडप, रोषणाई, देखावे, महाप्रसाद आणि इतर कार्यक्रमांसाठी लागणारी वीज व्यवस्था केवळ अधिकृत वीज कंत्राटदारांकडूनच करून घेण्याची सूचनाही महावितरणने दिली आहे.

सुरक्षित उत्सवासाठी महत्त्वाची खबरदारी सुरक्षित अंतर राखा: रोषणाई आणि देखावे उभारताना परिसरातील वीज वाहिन्या, खांब किंवा वितरण रोहित्रांपासून सुरक्षित अंतर ठेवा. योग्य न्यूट्रलचा वापर: वीजपुरवठा आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्यूट्रल घ्या. यामुळे जनरेटरमधील वीज लघुदाब वाहिनीत प्रवाहित होऊन होणारे संभाव्य अपघात टाळता येतात.

'हुक' टाकणे टाळा: जवळच्या वीज खांबांवर किंवा वाहिन्यांवर 'हुक' टाकून वीज घेऊ नका. यामुळे जीवित आणि वित्तहानीचा मोठा धोका असतो. उपकरणांची तपासणी: वीज जोडणीसाठी वापरण्यात येणारी तार किंवा केबल विजेचा भार पेलण्यास सक्षम असल्याची खात्री करा. जुनी किंवा तुटलेली तार वापरू नका. सर्व विद्युत उपकरणांचे योग्य अर्थिंग असल्याची खात्री करा आणि वेळोवेळी त्याची चाचणी घ्या. मल्टी प्लग टाळा: एकाच मल्टी प्लगवर अनेक उपकरणे जोडू नका. मंडळांसाठी विशेष सुविधा आणि मदतीचे पर्याय गणेशोत्सवासाठी तात्पुरती वीज जोडणी घेण्यासाठी महावितरण आपल्या सर्व कार्यालयांतून विशेष शिबिरे आयोजित करत आहे. या शिबिरात मंडळांना आवश्यक ती सर्व मदत दिली जात आहे. या जोडणीसाठी मंडळांना नोंदणी प्रमाणपत्र, स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी, पोलीस परवाना, विद्युत निरीक्षकांचे प्रमाणपत्र यासारखी कागदपत्रे सादर करावी लागतील. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, तात्पुरत्या जोडणीसाठी भरलेली अनामत रक्कम मंडळांना विनाविलंब परत मिळणार आहे. मंडळांनी ही रक्कम ऑनलाइन भरल्यास, गणेशोत्सव संपल्यानंतर वीज बिलाची रक्कम वजा करून उरलेली रक्कम लगेच परत दिली जाईल, असेही महावितरणने स्पष्ट केले आहे. आणीबाणीच्या परिस्थितीत मदतीसाठी, मंडळांनी खालील 24 तास सुरू असणाऱ्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा: 1912, 19120, 18002123435 किंवा 18002333435. याशिवाय, संबंधित भागातील महावितरणच्या अभियंत्यांचे मोबाईल क्रमांक जवळ ठेवावेत. चला, बाप्पाचा उत्सव साजरा करताना सुरक्षेला प्राधान्य देऊया आणि एका जबाबदार मंडळाची ओळख निर्माण करूया.

**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी,**
**महावितरण, नागपूर**

# मुरुड रेल्वे थांबण्यासाठी जनसागर; अन्यायाविरुद्धचा एल्गार!

## रेल्वे थांबण्यासाठी मुरुड करांचा मोठा जनसागर

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी**
**मोहम्मद पिंजारी–**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी मुरुड शहर व परिसराने आपल्या इतिहासात एक अभूतपूर्व पान लिहिले. गावोगावची दुकाने बंद ठेवून महिला, विद्यार्थी, शेतकरी व सर्वसामान्य नागरिक रेल्वे थांब्याच्या हक्कासाठी एकजुटीने रस्त्यावर उतरले

सार्वजनिक ध्वजारोहणानंतर प्रचंड जनसागर स्थानकाच्या दिशेने निघाला. हातात तिरंगा, डोक्यावर संताप आणि ओठांवर घोषणांचा आवाज – "भारत माता की जय", "रेल्वे थांबा द्या", "मुरुडला न्याय द्या" – असा गगनभेदी जयघोष वातावरणात दुमदुमला. दोन ते तीन किलोमीटर लांबीपर्यंतचा मानवी सागर पाहून प्रशासनही थरारून गेले

नागरिकांच्या हातात "रेल्वे थांबा झालाच पाहिजे" असे फलक होते, तर विद्यार्थ्यांनी "भविष्याचा हक्क हिरावू नका" असा ठळक संदेश दिला. मुरुडची बाजारपेठ पूर्णपणे बंद ठेवून व्यापाऱ्यांनी या आंदोलनाला आपला मूक पण ठाम



पाठिंबा दिला

आंदोलनात खासदार आणि स्थानिक नेतेही सहभागी झाले. त्यानंतर स्थानक परिसरात माजी सैनिक यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले, व गांधीगिरी मार्गाने एक प्रकारचे आंदोलन मुरुडकर यांनी दाखवले खासदारांनी लोकांसमोर आश्वासन दिले की – "मुरुड रेल्वे स्थानकासाठी संसद व मंत्रालयात सातत्याने पाठपुरावा केला जाईल." या वक्तव्याने आंदोलनकर्त्यांना आशेचा किरण मिळाला; मात्र जनतेने स्पष्ट केले – "आश्वासन पुरेसे नाही, प्रत्यक्ष थांबा मिळाल्याशिवाय संघर्ष थांबणार नाही."

महिला संघटनांनी घोषणाबाजी करत प्रशासनाच्या अन्यायाचा जाहीर निषेध केला. विद्यार्थ्यांनी रेल्वे थांब्याविना शिक्षण व भविष्यातील संधींवर होणारे परिणाम अधोरेखित केले. ज्येष्ठ नागरिकांनी "आम्ही आयुष्यभर थांबा मागत आहोत, पण आमचा आवाज आजवर कोणी ऐकला नाही" अशा शब्दांत मनातील वेदना व्यक्त केल्या

स्थानक परिसरात पोलिस बंदोबस्त असला तरी जनसमुदाय शिस्तबद्ध राहिला. प्रत्येकाच्या डोळ्यांत रोजच्या प्रवासाचा त्रास, अपमान आणि दुर्लक्षाचा राग होता; तरीही त्या डोळ्यांत आशेचा प्रकाशही होता – "१७ सप्टेंबरपूर्वी न्याय मिळेल" या विश्वासाचा.

भव्य आंदोलनामुळे मुरुड रेल्वे स्थानकासाठीची लढाई निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. मुरुडकरांनी स्वातंत्र्य दिनी दिलेला हा एल्गार केवळ मागणी नाही, तर अंतिम लढाईची हाक आहे. १७ सप्टेंबरपर्यंत ठोस निर्णय न झाल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जनसागराने दिला आहे.

> "हरंगुळ–पुणे आणि लातूर–मुंबई या गाड्या थांबवण्याचे प्रशासनाकडून आश्वासन दिले आहे; मात्र आश्वासनांवर आता विश्वास ठेवण्याची वेळ नाही. १७ सप्टेंबरपर्यंत ठोस निर्णय झाला नाही, तर आणखी तीव्र आणि निर्णायक आंदोलन उभे राहील."
> **– डॉ. हनुमान दास चांडक**
> **कार्यवाहक, मुरुड रेल्वे संघर्ष समिती**

# संत सेना महाराज पुण्यतिथी निमित्त माणुसकी वृध्द आश्रमात महाप्रसादाचे वाटप.

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा प्रतिनिधी:- रमेश सुरशे (छत्रपती संभाजीनगर)**

राष्टसंत सेना महाराजांच्या पुण्यतिथी निमित्ताने सु-लक्ष्मी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षी सुद्धा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे हे ९ वे वर्षे आहे,समाजसेवक सुमित पंडित यांनी संत सेना महाराज यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून पुजन केले,सौ.पुजा सुमित पंडित यांच्या हस्ते संत सेना महाराजांची महाआरती करून या कार्यक्रमाची सुरवात केली.सुमित यांनी संत सेना महाराजांच्या जीवनकाळावर प्रकाश टाकत "चित्त नाहीं हातीं करूं जाता हरिभक्ति॥ मज तुली वासना।भेटी द्यावी नारायणा॥कोण जाणे दानधर्म।नव्हे स्वतंत्र कैचें कर्म॥सेना म्हणे सांगें मात।जेणें माझें होय हित॥सेना म्हणे करा रे बदल| वरिवर्तनाचे गुण आचरावे|| उपस्थितांना मार्गदर्शन केले.

संत सेना महाराज पुण्यतिथी निमित्त माणुसकी वृध्द आश्रमात महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला.यावेळी चार्ली फाउंडेशन चे सोमनाथ स्वभावणे,समाजसेवक सुमित पंडित,मुबारक शहा सर,विजय निंबाळकर,
कल्पेश पंडित,देविदास पंडित,समाजसेविका पुजा पंडित,प्रियंका मॅडम,लक्ष्मी पंडित,आदिंनी परिश्रम घेतले.



# महामहिम राज्यपाल हरिभाऊ बागडे नाना हे सहकार व राजकारणाचे चालते फिरते विद्यापीठ -आमदार अब्दुल सत्तार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोडः-** महामहिम, राज्यपाल हरिभाऊ बागडे नाना हे सहकार व राजकारणाचे चालतेफिरते विद्यापीठ असून हरिभाऊ बागडे नाना यांचा सामान्य शेतकरी ते राज्यपाल हा जीवनप्रवास प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार माजी पालकमंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येथे आयोजित मा. हरिभाऊ बागडे यांचा अभिष्टचिंतन सोहळा प्रसंगी व्यक्त केले.

महामहिम, राज्यपाल हरिभाऊ बागडे नाना यांचा अभिष्टचिंतन सोहळा छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा सहकारी बँकेच्या सभागृहात संपन्न झाला. आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते तसेच आमदार सौ. अनुराधा चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यपाल बागडे नाना यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. या अभिष्टचिंतन सोहळा प्रसंगी मनोगत व्यक्त करीत असताना आमदार अब्दुल सत्तार बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, व्हाईस चेअरमन किरण पा. डोणगावकर, संचालक जावेद पटेल, कृष्णा पा. डोणगावकर, अप्पासाहेब पाटील, सुहास सिरसाट, डॉ. मनोज राठोड, जगन्नाथ काळे, डॉ. दिनेससिंह परदेशी, डॉ. सतिश गायकवाड, अण्णासाहेब माने, रामहरी जाधव, फारूक रउफ शेख यांच्यासह माजी जि. प. उपाध्यक्ष केशवराव पा. तायडे, रामुकाका शेळके, सिल्लोड कृउबा समितीचे सभापती विश्वास पा. दाभाडे, माजी सभापती रामदास पालोदकर, नंदकिशोर सहारे, विनोद मंडलेचा , श्रीरंग पा.साळवे, देविदास पालोदकर, पुंडलिक काजे, शिवाजीराव पाथ्रीकर आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलत असतांना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, प्रधानमंत्री यांनी हरिभाऊ बागडे यांच्या कामांची दखल घेऊन त्यांना राजस्थानचे राज्यपाल पदी नियुक्ती करून त्यांच्या कामाचा गौरव केला. हा आपल्या जिल्ह्यासाठी स्वाभिमानाची बाब आहे. बागडे नाना यांनी जिल्हा बॅकेला कायम झुकते माप दिले.

जी वस्तू आपली नाही, त्याचा मोह कधी बाळगायचा नाही असे स्पष्ट करीत प्रामाणिकपणे धोरण समोर ठेवून काम ।केल्यास सहकार क्षेत्र टिकून राहते असे राज्यपाल हरिभाऊ बागडे आपल्या सत्काराला उत्तर देतांना म्हणाले.

यावेळी राज्यपाल बागडे यांनी आपल्या भाषणात आयुष्यातील खडतर आठवणीना उजाळा दिला. आयुष्यात प्रामाणिकपणे काम केले त्यामुळे कधीच कुणाची भीती वाटली नाही. निस्वार्थ भावना समोर ठेवून काम केल्यास सहकार क्षेत्र डबघाईला येणार नाही. विविध उपक्रम राबवून सहकार क्षेत्राला सक्षम करण्यासाठी प्रयत्न करा. गावातील शिक्षण व्यवस्थाकडे प्रत्येकाने लक्ष दिले पाहिजे कारण येणारी बुद्धिमान पुढी हे राष्ट्राचे वैभव आहे. जिल्हा बँकेने केलेल्या सत्काराला आपण भारावून गेलो असल्याची भावना व्यक्त करीत राज्यपाल बागडे यांनी केलेल्या सत्काराबद्दल आभार मानले.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अपर्णा आद्यपक यांनी केले. प्रास्ताविक चेअरमन अर्जुन पा. गाढे यांनी तर शेवटी व्हाईस चेअरमन किरण पा. डोणगावकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास बँकेचे सभासद, हितचिंतक, ग्राहक व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी आमदार सौ. अनुराधा चव्हाण यांनी मनोगत व्यक्त करून राज्यपाल हरिभाऊ बागडे यांना शुभेच्छा दिल्या. बागडे नाना यांच्याकडे कामाचे काटेकोरपणे नियोजन असते त्यांचे कार्य आमच्यासाठी उर्जादायी असल्याचे आमदार सौ अनुराधा चव्हाण म्हणाल्या.

बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे यांनी प्रस्ताविक करतांना बागडे नाना याचे सहकार क्षेत्रात मोठे योगदान असल्याचे सांगितले. जिल्हा बँकेच्या अडीअडचणी बाबत त्यांनी पुढाकार घेवून अनेक प्रश्न मार्गी लावले.

# तिवरे गावचे वै.ह.भ.प. श्री महादेव काशिबा दळवी बोवा यांच्या शताब्दीपूर्ती पुण्यस्मरण वर्षानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन व आरोग्यदायी साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**राजापूरः- (प्रमोद तरळ)**

कोकणातील वारकरी संप्रदायाचे जनक व जनमाणसात भक्ती-साधनेचा प्रसार करणारे थोर संत, रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापूर तालुक्यातील, तिवरे गावचे वै. ह. भ. प. श्री महादेव काशिबा दळवी बोवा यांचे हे शताब्दीपूर्ती पुण्यस्मरण वर्ष असून, त्यांच्या पवित्र स्मृतीप्रीत्यर्थ वै. ह. भ. प. श्री महादेव काशिबा दळवी बोवा संस्थेच्यावतीने आदर्श विद्यामंदिर वाटूळ, माध्यमिक विद्यामंदिर, ओझर येथे 'वक्तृत्व' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. इयत्ता पाचवी ते सातवी (किशोर गट) व आठवी ते दहावी (कुमार गट) अशा दोन गटांत ही स्पर्धा पार पडली.

दोन्ही गटांतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे व प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात आले.

आदर्श विद्या मंदिर, वाटूळ विजेते कुमार गट (८वी ते १०वी) प्रथम क्रमांकः- कु. मृण्मयी रुपेश चव्हाण
द्वितीय क्रमांकः- कु. राखी जनार्दन घाडी व कु. सिद्धी गावखडकर, तृतीय क्रमांकः- कु. वैदही मांडवकर व कु. निरिजा राजापकर, किशोर गट (५वी ते ७ वी) प्रथम क्रमांकः- कु. मधुरा चव्हाण
द्वितीय क्रमांकः- कु. ओम उदय यादव
तृतीय क्रमांकः- कु. सार्थक चव्हाण व कु. वैदही साबळे,

माध्यमिक विद्यामंदिर, ओझर विजेते (कुमार गट- ८वी ते १०वी) प्रथम क्रमांकः- कु. तहुरा अल्लाउद्दीन हसोळकर, द्वितीय क्रमांकः- कु. पूर्वा पांडुरंग पळसमकर, तृतीय क्रमांकः- कु. दिया मंगेश गुरव,

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी आदर्श विद्यामंदिर, वाटूळचे मुख्याध्यापक श्री. संदिप मयेकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. आनंद त्रिपाठी तसेच माध्यमिक विद्यामंदिर, ओझरचे मुख्याध्यापक श्री. मुरलीधर खानविलकर यांनी विशेष मेहनत घेतली.

दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभास संबंधित शाळांच्या संस्थेचे पदाधिकारी श्री. विश्वास चव्हाण (अध्यक्ष), श्री. विजय चव्हाण (शाळा समिती अध्यक्ष) व ओझर ग्रामपंचायतीचे प्रथम नागरिक श्री. विकास रेगे, दळवी बोवा संस्थेचे अध्यक्ष श्री. नामदेव दळवी, सचिव श्री. प्रसाद दळवी, पदाधिकारी श्री. तुकाराम दळवी, श्री. प्रकाश दळवी, सौ. सुवर्णा दळवी व सौ. श्रद्धा दळवी तसेच परिसरातील इतर मान्यवर उपस्थित होते.

याच दिवशी दळवी बोवा संस्थेच्यावतीने एकूण-०६ जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना आरोग्यदायी साहित्याचे वाटप करण्यात आले. यात वाटूळ शाळा क्रमांकः- १ व ४, प्राथमिक शाळा ओझर, प्राथमिक शाळा कोंड-तिवरे, प्राथमिक शाळा शिरवली व प्राथमिक शाळा कुरंग या शाळांचा समावेश होता.

दळवी बोवा संस्थेच्या या स्तुत्य उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, संस्थेच्या कार्याबद्दल स्तुतिसुमने उधळली जात आहेत.

# पाण्याची टाकी फुटल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामावर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल शहरातील प्रशासकीय भवनाच्या वर असणारी 10 हजार लिटरची पाण्याची टाकी फुटल्याने पीडब्ल्यूडीच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

एक ते दीड वर्षांपूर्वी पनवेल येथील प्रशासकीय भवन सुरू करण्यात आले. या ठिकाणी अपर तहसील कार्यालय, मुद्रांक शुल्क विभाग कार्यालय सुरू करण्यात आले आहेत. प्रशासकीय भवनाच्या वर पाण्याच्या टाक्या ठेवण्यात आल्या आहेत. मात्र ही पाण्याची टाकी फुटल्याने यातील सर्व पाणी वाया गेले. दहा हजार लिटरची पाण्याची टाकी काहीच वर्षात कशी फुटू शकते असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे. काही वर्षातच पाण्याची टाकी फुटल्याने पीडब्ल्यूडीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. वर असणारी पाण्याची टाकी फुटल्याने अधिकारी तसेच येथे येणाऱ्या नागरिकांना देखील पिण्याच्या पाण्याची वानवा निर्माण झाली आहे. अशा प्रकारचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.



# अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी 1 लाख रुपये मदत द्या :

## अजय पाटील कदम युवासेना तालुकाप्रमुख मागणी

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी**
**विशाल भालेराव**

किनवट,दि.२० : किनवट व माहूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीचे पंचनामे पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी 1 लाख रुपये मदत तत्काळ द्यावी, अशी मागणी युवा सेना तालुकाप्रमुख अजय पाटील कदम यांनी प्रशासनाकडे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे निवेदनाद्वारे आज(ता .२०) करण्यात आली आहे.

15 .16 17.ऑगस्ट रोजी संपूर्ण किनवट व माहूर तालुक्यात अतिवृष्टी झाली.या दोन तालुक्यातील काही मंडळात तर ढगफुटी झाली. नद्या, नाले, ओढ्यांचे पाणी शेतामध्ये शिरल्यामुळे संपूर्ण पिके उद्ध्वस्त झाली आहेत. शेतातील साहित्य पाण्यामध्ये वाहून गेले आहे घराची पडझड झाली आहे बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी 1 लाख रुपयांची मदत तत्काळ जाहीर करावी. पशुधन दगावलेल्या शेतकऱ्यांना देखील एक लाख रुपयांची मदत करावी.अतिवृष्टीने वाहून गेलेल्या पुलांचे , रस्त्यांचे जलद गतीने कामे करा,

येत्या एक महीन्याच्या आत बाधित शेतकऱ्यांना मदत करावी या मागणीचे निवेदन युवासेनेचे तालुकाप्रमुख अजय पाटील कदम.विधानसभा प्रमुख दया पाटील. बालाजी मेश्राम. अतिश शिंदे .सुनील पवार .राहुल बेंद्रे. संजय शिंदे. दिलीप पवार. विवेक शिंदे. यांनी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे दिली आहे.




# रायपूरच्या वेदिका कुकडे हिची एम.बी. बी.एस.साठी निवड.

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना(अशोक ठोके)**

**रायपूर,** तालुका परतूर, जिल्हा जालना येथील वेदिका राजेश कुकडे हिने नीट 2025 परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले असून तिची शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आंबेजोगाई येथे एम.बी.बी.एस. या वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी शासकीय कोट्यातून निवड झाली आहे. वेदिका ही रायपूर या गावातील एम बी.बी.एस. साठी निवड होणारी पहिली मुलगी ठरली आहे.वेदिकाच्या या यशाबद्दल तिची आई विद्या कुकडे, वडील राजेश कुकडे व आजी कौशल्याबाई कुकडे यांनी समाधान व्यक्त केले आहे. वेदिकावर व तिच्या आई-वडिलांवर सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# महावितरणचा ‘सौर ग्राम दिन’: वीज ग्राहकांना आत्मनिर्भरतेची हाक

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू नागपूर विभागीय संपादक**

**नागपूर, दि. 19 ऑगस्ट 2025** – स्वातंत्र्याच्या 79 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून, ‘महावितरण’ने नागपूर जिल्ह्यात ‘सौर ग्राम दिन’ या विशेष उपक्रमाचे आयोजन केले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील वीज ग्राहकांना सौर ऊर्जेचे महत्त्व पटवून देणे आणि त्यांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध सौर ऊर्जा योजनांचा लाभ घेण्यास प्रोत्साहित करणे हा होता. या अभियानामुळे शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातही सौर ऊर्जेची क्रांती घडवून आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.




या अभियानाची सुरुवात नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते झाली. त्यांनी परिमंडल कार्यालयातून ‘सौर ऊर्जा रथाला’ हिरवा झेंडा दाखवून या उपक्रमाचा शुभारंभ केला. या रथाने विविध भागांमध्ये ‘प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना’,‘मागेल त्याला सौर कृषी पंप‘, ‘प्रधानमंत्री कुसुम योजना’ आणि ‘मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०’ यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजनांची सविस्तर माहिती दिली.

या अभियानात महावितरणचे वरिष्ठ अधिकारी आणि अभियंते थेट ग्रामसभांमध्ये सहभागी झाले. त्यांनी गावातील लोकांना सौर ऊर्जेचे फायदे समजावून सांगितले आणि वीज बिलावरील खर्च कसा कमी करता येईल, याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच, या योजनांमध्ये सहभागी होण्यासाठी लागणारे अर्ज आणि आवश्यक कागदपत्रेही त्यांनी ग्रामसभांच्या ठिकाणीच स्वीकारली.

शहरी भागात ‘प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला’ आधीच मोठा प्रतिसाद मिळत आहे. आता महावितरण ग्रामीण भागातील नागरिकांनाही या योजनेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. या योजनेअंतर्गत, घराच्या छतावर सौर पॅनेल बसवून वीज निर्मिती करता येते, ज्यामुळे वीज बिल जवळजवळ शून्य होते. याचबरोबर, 'मागेल त्याला सौर कृषीपंप' ही योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. या योजनेमुळे शेतीला दिवसाही वीज उपलब्ध होते, ज्यामुळे शेती सिंचनासाठी मोठा फायदा होतो आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत असल्याची माहिती यावेळी नागरिकांना देण्यात आली.

या जनजागृती मोहिमेला ग्रामीण भागातून, विशेषतः ग्रामपंचायतींच्या ग्रामसभा, शाळा, महाविद्यालये, बस स्थानके, कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि आठवडी बाजारातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रॅली आणि प्रभातफेऱ्या काढूनही या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यात आली. या उपक्रमात सरपंच, उपसरपंच आणि ग्राम विकास अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेतली. अनेक ग्रामस्थांनीही या योजनांमध्ये सहभागी होण्याची तयारी दर्शवली,

नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी सांगितले की, प्रत्येक शाखा कार्यालयांतर्गत किमान एक गाव पूर्णपणे सौर ऊर्जेवर आणण्याचे महावितरणचे उद्दिष्ट आहे. त्यांनी नागरिकांना ‘वीज ग्राहक’ न राहता ‘वीज उत्पादक’ बनण्याचे आवाहन केले, जेणेकरून मा. पंतप्रधानांच्या ‘हरित ऊर्जेच्या’ स्वप्नाला बळ मिळेल.

वायगाव (घो.) येथील ग्रामसभेत सौरन योजनांची माहिती देतांना महावितरण अधिकारी

**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, नागपूर**

# थेरोंडा गावाचा अभिमान! आगलेची वाडीतील तरुणांनी दिले समुद्री कासवांना जीवदान

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

समुद्रकिनारी जाळ्यात अडकलेल्या दोन दुर्मीळ कासवांना दिला नवसंजीवनीचा श्वास.मानवतेचा अद्‌भुत परिचय युवकांच्या धाडसामुळे कासवांचे प्राण वाचले.रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील थेरोंडा आगलेचीवाडी परिसरात घडलेली एक अनोखी घटना ग्रामस्थांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे. समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारायला गेलेल्या स्थानिक युवकांच्या सतर्कतेमुळे आणि धाडसामुळे दोन दुर्मीळ कासवांचे प्राण वाचले. घटना अशी की, आगळेचीवाडी बंधाऱ्याजवळ दुपारी १२ वाजताच्या सुमारास काही युवक किनाऱ्यावर फिरत असताना, खाडीजवळ मच्छीमारांनी टाकलेल्या जाळ्यात दोन प्रचंड आकाराची समुद्री कासवे तडफडताना दिसली. साधारणपणे पाच ते सहा फूट लांब असलेली ही कासवे जाळ्यात घट्ट अडकून जिवाच्या आकांताने सुटण्यासाठी झुंजत होती.ही माहिती मिळताच सचिन बळी, सुशांत बळी, कुलदीप बळी, संजय जावसेन, महेश हाडके आणि सुधाकर हाडके या सहा धाडसी युवकांनी कोणतीही वेळ न दवडता घटनास्थळी धाव घेतली. कासवे प्रचंड आकाराची असल्याने जाळी सोडवताना युवकांना बराच त्रास सहन करावा लागला. समुद्राच्या लाटांचा मारा, कासवांची तडफड आणि जाळीची गुंतागुंत या सगळ्यात धोका होता. मात्र, संयम आणि चिकाटी ठेवून त्यांनी जवळजवळ अर्ध्या तासाच्या प्रयत्नानंतर दोन्ही कासवे सुखरूपपणे जाळ्यातून मुक्त केली.यानंतर युवकांनी या दोनही कासवांना परत समुद्राच्या खोल पाण्यात सोडून दिले. मुक्त झाल्यावर कासवे लाटांबरोबर सहजपणे समुद्रात विलीन झाली आणि उपस्थित ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास टाकला.या संवेदनशील कृतीमुळे गावात कौतुकाची लाट उसळली आहे. “ही कासवे समुद्राच्या जैवविविधतेचा एक महत्त्वाचा घटक आहेत. त्यांचे अस्तित्व टिकवणे आपली जबाबदारी आहे,” असा संदेश या घटनेतून अधोरेखित झाला. ग्रामस्थांनी युवकांच्या मानवतेच्या आणि धाडसाच्या या कार्याचे कौतुक केले असून “कासवांना दिलेले हे जीवदान गावासाठी अभिमानाची बाब आहे,” अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या.पर्यावरणप्रेमींनी देखील या कृतीचे स्वागत करताना सांगितले की, अशा घटनांमधून युवकांनी दिलेला आदर्श संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे.

